पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ८२ ● सोमवार, दि २८ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो.




## »थोडक्यात

### शेअर बाजारात भूकंप, सन्सेक्स ७०० अंकांनी आपटला

दिल्ली : भारतीय शेअर बाजारानं सोमवारी घसरणीसह सुरुवात केली. शुक्रवारी वाढीसह बंद झालेल्या बाजारात सोमवारी सकाळी विक्रीचा दबाव दिसून आला. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ७०० अंकांपेक्षा जास्त घसरला, तर निफ्टी २३,००० च्या पातळीखाली घसरला. बाजारातील वाढत्या अस्थिरतेचे संकेत इंडिया व्हीआयएक्समध्ये सुमारे ६ टक्के झालेल्या वाढीतूनही मिळाले. तसेच सोमवारी सकाळीच सोने-चांदीच्या भावात मोठी घसरण सुरू झाली आहे. आंतरराष्ट्रीय कमोडिटी बाजार सकाळी ७.५० वाजेपर्यंतच सोन्याचा भाव १.७० टक्केच्या मोठ्या घसरणीनंतर ४,२४७.६० डॉलर प्रति औंसवर आला.

---

### लव्हली प्रोफेशनल विद्यापीठात हिंसेचा आगडोंब!

चंदीगड : पंजाबमधील फगवाडामधील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठात हिंसेचा भडका उडाला. विद्यापीठ परिसरातील अनेक वाहने जाळण्यात आली. रविवारी रात्री अनेक ठिकाणी तोडफोड करण्यात आली. विद्यार्थी प्रचंड आक्रमक झाल्यामुळे विद्यापीठ परिसरात प्रचंड तणाव असून, प्रशासनाने २८ सप्टेंबरपासून पुढील दहा दिवसांसाठी शिकवण्या बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना विद्यापीठात पसरली.

---

### राज्यात वादळी पावसाचा प्रभाव ओसरला!

मुंबई : राज्यात मागील काही दिवसांपासून वादळी पावसाच्या प्रभावामुळे तुरळक ठिकाणी पावसाची नोंद होत असली तरीही या दरम्यान सर्वदूर पावसाचा अभाव असल्याचे पावसाच्या आकडेवारीवरुन दिसून येत आहे. दरम्यान, वादळी पावसाचा प्रभाव हळूहळू ओसरत असून पुढील दोन दिवस मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे असून राज्यातील अनेक भागात सध्या उकाड्यात वाढ झाली आहे.

# शाही मशिदीचा वाद भडकला!

वृत्तसंस्था २८ सप्टेंबर

**उज्जैन :** उज्जैनमधील शाही मशिदीच्या पाडकामावरून निर्माण झालेला वाद वाढतच चालला आहे. पोलिसांवर पुन्हा एकदा दगडफेक करण्यात आली. प्रत्युत्तरादाखल लाठीचार्ज आणि अश्रुधूर वापरण्यात आला. सोमवारी सकाळीही दगडफेक झाली, त्यानंतर अश्रुधूर सोडण्यात आला. एक महिला स्टेशन प्रभारी जखमी झाल्या. या प्रकरणी पोलिसांनी १० जणांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. त्यापैकी पाच जण सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असून, त्यांच्यावर वातावरण बिघडवल्याचा आरोप आहे. मात्र, त्यांच्या अटकेबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. पाच बाहेरील व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.दरम्यान, मुस्लिम समाजाने स्वतः मशीद पाडण्यास सुरुवात केल्याचे वृत्त समोर आले आहे. मशिदीचा सुमारे ९ फूट लांब आणि ४ फूट रुंद असलेला एक भाग पाडण्यात येणार आहे. उच्च न्यायालयाचे इंदूर खंडपीठ सोमवारी या प्रकरणाची सुनावणी करणार आहे. उज्जैनमध्ये शाही मशिदीजवळ मोठ्या संख्येने पोलीस दल तैनात आहे. पोलीस अधिकारी घटनास्थळी उपस्थित असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. उज्जैनमधील शाही मशिदीजवळ आजूबाजूच्या परिसरातील पोलीस दल तैनात करण्यात आले आहे. शाही मशिदीजवळ अनेक पोलीस ठाण्यांमधील दल तैनात करण्यात आले आहे. दगडफेकीनंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या.अधिक समजावून सांगितल्यानंतर जेव्हा पुन्हा दगडफेक सुरू झाली, तेव्हा जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी कारवाई केली. माहिती मिळताच घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त दाखल झाला.

### शाही मशीद सुमारे १०० वर्षे जुनी

मशीद व्यवस्थापनाचा दावा आहे की उज्जैनची शाही मशीद १०० वर्षांहून अधिक जुनी आहे. आंदोलकांचा हवाला देणाऱ्या काही वृत्तांनुसार, ती ६०० वर्षे जुनी आहे. मशीद व्यवस्थापनाच्या मते, शिंदे राजघराण्याच्या काळातील १७ मार्च १९२५ रोजीच्या एका दस्तऐवजात उल्लेख आहे की, भूसंपादनानंतर मशिदीचा उर्वरित भाग जतन करण्यात आला होता. यानंतर, १९७५ मध्ये, रस्ते आणि वाहतूक विकासासाठी आपली काही जमीन दिल्याचे मशीद व्यवस्थापनाने म्हटले आहे. मध्य प्रदेश सरकारच्या १३ सप्टेंबर १९८५ रोजीच्या राजपत्रातही मशिदीचा आणि तिच्या मापाचा उल्लेख आहे.







पोलिसांवर पुन्हा **दगडफेक** प्रत्युत्तरात लाठीचार्ज आणि अश्रुधूर

आज सकाळीही **दगडफेक** महिला पोलिस कर्मचारी जखमी

या प्रकरणी पोलिसांनी **10 जणाविरुद्ध** एफआयआर दाखल केला. 5 बाहेरील व्यक्तीना अटक

# बँकांचा संप टळला!

वृत्तसंस्था २८ सप्टेंबर

**दिल्ली :** देशभरातील बँक ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी आहे. २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान होणारा तीन दिवसांचा देशव्यापी बँक संप अखेर स्थगित करण्यात आला आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने रविवार, २७ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा यासंदर्भात अधिकृत घोषणा केली.हाफ-इयरली क्लोजिंगच्या कालावधीत हा संप होणार असल्याने बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होण्याची शक्यता होती. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांसह व्यापारी आणि व्यावसायिक व्यवहारांवरही त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. या सर्व कारणांमुळे रविवार रात्री झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पीकेव्हीचे वैध प्रकल्पग्रस्त 7 ऑक्टोबरला करणार सामूहिक आत्मदहन!

## कुलसचिवांना निवेदनातून इशारा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

अकोला : येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात १० ऑगस्टला प्रकल्पग्रस्त मजूर व चौकीदार यांच्या १७२ आर्डर काढल्या. मात्र आमच्या ऑर्डरी काढल्या नाहीत, आम्ही वैध प्रकल्पग्रस्त असूनही हा आमच्यावर अन्याय आहे. दोन महिन्यांपासून वेतन नसल्याने आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे ६ ऑक्टोबरपर्यंत आमच्या ऑर्डर काढल्या नाही तर आम्ही वैध प्रकल्पग्रस्त ७ ऑक्टोबरला सामूहिक आत्मदहन करणार आहोत, असा इशारा पीकेव्हीचे कुलसचिव यांना निवेदनातून वैध प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे. निवेदनता म्हटले आहे की, १४ लोकांचे व्हेरीफिकेशन बाकी असल्यामुळे आम्ही वैध असूनही



आमची ऑर्डर काढण्यात आली नाही. कुलसचिवांना याबाबत विचारले असता ते म्हणाले की,बाकी लोकांचे व्हेरीफिकेशनासाठी पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. परंतु याला २ महिने होत आले तरी व्हेरीफिकेशन झाले नाही. याबाबत पुनर्वसन अधिकारी यांना विचारले असता पुनर्वसन अधिकारी म्हणता तुम्ही तुमची आर्डर कृषी विद्यापीठाकडून घ्या. त्यामुळे २१ सप्टेंबरला कुलसचिव यांना पुन्हा भेटलो असता त्यांनी म्हटले की पुनर्वसन अधिकारी यांचा अहवाल आल्याशिवाय ऑर्डर देत नाही. आम्ही वैध असून आम्हाला प्रतीक्षा यादीत ठेवले आहे.या टोलवाटोलवीमुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आम्हाला ६ ऑक्टोबरपर्यंत ऑर्डर न दिल्यास आम्ही सर्व वैध असलेले प्रकल्पग्रस्त ७ ऑक्टोबर रोजी सामूहिक आत्मदहन करणार आहोत, असेही निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर दर्शनसिंग चाहेल मुर्तिजापूर, जुबेर पटेल रा. बोरगाव, वामन देशमुख रा. पैलपाडा, सिंकदर अली रा. काटेपूर्णा, मो. जहेद, खाँ, हमिद खॉ. रा. बोरगाव, सुधिर अग्रवाल रा. बोरगाव आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# अजितदादांसाठीचा लढा थांबलेला नाही!

## रोहित पवारांचा १० ऑक्टोबरचा इशारा, 'मफलरीं'चे खुलासे करणार

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात आयोजित केलेली आजची महत्त्वाची पत्रकार परिषद अचानक पुढे ढकलली आहे. देशात सध्या सुरू असलेला निवडणूक आयोगाचा वाद आणि राज्यावर ओढावलेले भीषण दुष्काळी संकट, यामुळे ही पत्रकार परिषद पुढे ढकलत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, अजितदादांसाठीचा आपला लढा थांबलेला नाही, असे सांगत त्यांनी आता येत्या १० ऑक्टोबरला काही मोठे खुलासे करण्याचा इशारा दिला आहे.

रोहित पवार यांनी एक्सवर (ट्विटर) अजित पवार यांना उद्देशून एक भावनिक ट्विट केले आहे. 'तुमच्याविना यंदाचा गणेशोत्सव सुना सुना' अशा



शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याच ट्विटमध्ये त्यांनी माहिती दिली आहे की, आता येत्या १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ते एक विशेष पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत ते काही 'मफलरीं'चे खळबळजनक खुलासे करणार असल्याचे त्यांनी म्हटल्याने, राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.आजची पत्रकार परिषद पुढे ढकलली असली, तरी रोहित पवार यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करत राज्य सरकारला धारेवर धरले. 'राज्यातील शेतकऱ्यांना मदत करण्याची सर्वस्वी जबाबदारी या सरकारची आहे.

# रमेश म्हात्रेंचा जामीन रद्द!

## सुप्रीम कोर्टाचा दणका, पुन्हा कोठडीत रवानगी

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**मुंबई :** डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टरांना मारहाण केल्याने आधी मुंबई हायकोर्टाच्या रोषाला सामोरे जाऊन जामीन रद्द झालेले शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांना आता सुप्रीम कोर्टानेही सोमवारी मोठा दणका दिला आहे. मुंबई हायकोर्टाने अटींखाली मंजूर केलेला जामीन रद्द करत असल्याचे सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ व न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने राज्य सरकारच्या अपिलावरील सुनावणीअंती स्पष्ट केले. हायकोर्टाच्या अटीप्रमाणे जामिनावर असलेले रमेश म्हात्रे आणि अन्य तीन आरोपी यांची रवानगी पुन्हा कोठडीत होणार आहे. लवकरच लेखी आदेशही उपलब्ध होईल. 'वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी आणि डॉक्टर हे जनसेवा करतात. त्यांना कोणी हातही लावू शकत नाही, हा संदेश सर्वदूर पसरणे आवश्यक आहे. आरोपी म्हात्रेविरोधात १९ गुन्हे दाखल झाले होते. अशी पार्श्वभूमी असलेला नेता जर जामिनाबाहेर असेल तर निष्पक्ष खटला कसा चालू शकेल का? साक्षीदार निर्भयपणे साक्ष देतील का?', असे प्रश्न सुप्रीम कोर्टाने म्हात्रे व अन्य आरोपींच्या वकिलांसमोर सुनावणीदरम्यान उपस्थित केले.

# 'एफडीए'तील अधिकाऱ्यांकडून दरोडेखोरी!

## खासदार संजय राऊतांचे तुकाराम मुंढेंना पत्र

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**मुंबई :** अन्न व सुरक्षा भेसळ याबाबतच्या कारवाईबाबत अभिनंदन करत एफडीए अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या लुटीबाबत आरोप करीत ते एकप्रकारे दरोडेखोरी करीत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यासाठी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना एक पत्र लिहले आहे.

एफडीएतील पदनिर्देशित अधिकारी, सहाय्यक आयुक्त तसेच अन्न सुरक्षा अधिकारी उघडपणे हॉटेल,रेस्टॉरंट,क्विक कॉमर्स व्यवसायांना परवाना निलंबनाच्या धमक्या देऊन मोठ्या प्रमाणात वसुली करीत





आहेत. हॉटेल व्यावसायिकांना धमक्या, ब्लॅकमेल करून पैसे गोळा करण्याचा हा उद्योग आता पूर्वीपेक्षा जास्त जोमाने सुरू झाला आहे, असा आरोप संजय राऊत यांनी पत्रात करत तुकाराम मुंडेंना याबाबत तक्रार केली आहे. एफडीएचे बांद्रा मुख्यालय, ठाणे कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावर लुटीचा मुख्य अड्डा आहे. तेथे अधिकारी खुलेआम पैसे मागतात. नागपूर, पुणे, सोलापूर, वर्धा, छत्रपती संभाजीनगर येथील लुटीच्या 'कथा' घेऊन अनेक सामान्य व्यावसायिक मला भेटले, असा धक्कादायक खुलासा संजय राऊत यांनी आपल्या पत्रात केला आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, एका बाजूला आपण कारवाईचा, धाडीचा धडाका लावून व्यावसायिकांत दहशत निर्माण केली आहे. याबाबत आपण नेहमीप्रमाणेच 'प्रसिद्धी'च्या झोतात आहात. याचाच गैरफायदा एफडीएमधील अधिकारी घेत आहेत. व्यवस्था सुधारत असल्याचे आपण सांगता. पण स्वतःच्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण नसेल तर ही सुधारणा अर्धवट आहे. एफडीए अधिकारी आता फक्त पैसे मागत नाहीत, दरोडेखोरी करत आहेत. ही भाषा बहुसंख्य उद्योजकांची आहे. आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. आणखी एक मुद्दा स्पष्ट करतो. खाद्य उद्योग विखुरलेला आहे, संघटित नाही. म्हणून त्याच्यावर कारवाई सोपी जाते. फार्मा क्षेत्रातही गंभीर 'नॉन-कम्प्लायन्स' आहेत, पण त्यांची लॉबी मजबूत आहे. फार्मा कंपन्या सत्ताधारी पक्षांना हजारो कोटींच्या देणग्या देतात. त्यामुळे त्यांना 'वर'चा वरदहस्त आहे. लहान उद्योगावर हल्ला आणि मजबूत लॉबीकडे कानाडोळा हा आरोप आपण फेटाळला पाहिजे.



# मैत्रीला संशयाची चौकट का?

## स्त्री-पुरुष नात्यांकडे पाहण्याची मानसिकता, समाजकार्य आणि आत्मचिंतन



स्त्री आणि पुरुष यांच्यात मैत्री असू शकते का? या प्रश्नाचे उत्तर देताना आजही आपल्या समाजाला अनेक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. दोन व्यक्ती एकमेकांशी मोकळेपणाने बोलत असतील, एकमेकांना समजून घेत असतील, अडचणीच्या काळात साथ देत असतील, तर त्यांच्या नात्याला लगेच प्रेम, आकर्षण किंवा अन्य कोणत्यातरी संशयाच्या चौकटीत का बसवले जाते? मुळात मैत्रीला लिंग नसते. मैत्रीचा पाया असतो—विश्वास, आदर, समजूतदारपणा, संवाद आणि परस्परांच्या मर्यादांचा सन्मान.

कधी कधी एखाद्या महिलेला एखाद्या पुरुष मित्राशी काही विषय अधिक सहजपणे बोलता येतात. कारण तो तिचे म्हणणे स्पर्धेच्या किंवा तुलनेच्या भावनेतून न पाहता शांतपणे ऐकून घेतो. त्याचप्रमाणे एखाद्या पुरुषालाही एखाद्या महिला मैत्रिणीकडून भावनिक आधार, वेगळा दृष्टिकोन किंवा समजून घेणारा संवाद मिळू शकतो. याचा अर्थ प्रत्येक जवळीक प्रेमसंबंध आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरेल का? प्रत्येक जवळीक म्हणजे प्रेम नसते. प्रत्येक संवाद म्हणजे अफेअर नसते. प्रत्येक काळजीमागे स्वार्थ नसतो. नक्कीच, प्रत्येक नाते निर्दोषच असेल असेही नाही. काही संबंधांमध्ये मर्यादा ओलांडल्या जाऊ शकतात, गैरवर्तन होऊ शकते किंवा विश्वासाचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. म्हणूनच कोणत्याही नात्याकडे डोळे झाकून पाहण्याऐवजी वर्तन, पारदर्शकता, परस्पर संमती, मर्यादा आणि आदर हे निकष महत्त्वाचे ठरतात.

मात्र काही चुकीच्या अनुभवांच्या आधारे प्रत्येक स्त्री-पुरुष मैत्रीकडे संशयाने पाहणे हीसुद्धा अन्यायकारक मानसिकता आहे. समाजकार्याच्या क्षेत्रात हा प्रश्न अधिक गंभीर होतो समाजकार्य म्हणजे विविध वयोगटातील, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन काम करणे. बैठका, प्रशिक्षण, प्रवास, क्षेत्रभेटी, जनजागृती, आंदोलन, संघटन बांधणी, समुपदेशन अशा अनेक प्रक्रियांमध्ये परस्पर संवाद अपरिहार्य असतो.

विशेषतः महिलांच्या प्रश्नांवर काम करताना महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांमध्ये संवाद आणि सहकार्य असणे स्वाभाविक आहे. अशा प्रत्येक सहकार्याकडे संशयाच्या नजरेने पाहिले तर सामाजिक कामाचीच कोंडी होईल. दुर्दैवाने, समाजपरिवर्तन, पुरोगामित्व किंवा प्रबोधनाची भाषा करणाऱ्या काही मंडळींकडूनही कधी कधी व्यक्तीच्या कामापेक्षा तिच्या वैयक्तिक संबंधांवर चर्चा अधिक केली जाते. एखाद्या कार्यकर्त्याच्या कामावर, विचारांवर किंवा भूमिकेवर मतभेद असतील तर त्यावर वैचारिक चर्चा व्हायला हवी. परंतु एखाद्या स्त्री-पुरुषाच्या मैत्रीबद्दल संशय निर्माण करून त्याची सामाजिक प्रतिमा खराब करणे किंवा त्याच्या कामाला अडथळा आणणे हा वेगळाच प्रश्न आहे.

कामाचे मूल्यमापन कामावरून व्हावे; नात्यांच्या अफवांवरून नव्हे. स्वतः हा आपल्या कार्यावर विश्वास ठेऊन प्रगती करावी. दुसऱ्या च्या कामात अडचणी निर्माण करण्यासाठी जास्तीच्या उठाठेवी करणं योग्य नव्हे.संशय हा पुरावा नसतो आणि अफवा ही सत्याची जागा घेऊ शकत नाही.सत्य हे सत्यच असत आणि इथेच आत्मचिंतनाची गरज आहे

हा लेख कोणालाही वैयक्तिकरीत्या लक्ष्य करण्यासाठी नाही. उलट, तो आत्मचिंतनासाठी आहे—आरोप करणाऱ्यांसाठीही आणि आरोप सहन करणाऱ्यांसाठीही. ज्यांच्यावर संशय घेतला जातो त्यांनीही स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेत—आपल्या वागण्यात अशी कोणती गोष्ट आहे का जी गैरसमजाला कारणीभूत ठरू शकते? आपण नात्यांच्या मर्यादा स्पष्ट ठेवतो का? आपल्या वर्तनात पारदर्शकता आहे का? समोरच्या व्यक्तीच्या सन्मानाचा आपण पुरेसा विचार करतो का? आणि ज्यांना इतरांच्या नात्यांबद्दल संशय वाटतो त्यांनीही स्वतःला विचारायला हवे—आपल्याकडे ठोस तथ्य आहे का? की आपण ऐकीव माहितीवर प्रतिक्रिया देत आहोत? आपल्या मनात आधीपासून असलेल्या स्त्री-पुरुष संबंधांविषयीच्या पूर्वग्रहांचा प्रभाव तर नाही ना? आपल्या शब्दांमुळे एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा, मानसिकता किंवा सामाजिक काम बाधित होणार नाही ना? कारण आत्मचिंतनाची गरज केवळ आरोप झालेल्यांना नसते; आरोप करणाऱ्यांनाही असते. विचारपीठावर स्त्री-पुरुष समानतेची भाषा करणे सोपे आहे; पण प्रत्यक्ष जीवनात त्या समानतेवर विश्वास ठेवणे ही खरी कसोटी आहे. स्त्री आणि पुरुष एकत्र काम करू शकतात, मैत्री करू शकतात, एकमेकांना आधार देऊ शकतात आणि तरीही त्या नात्याला सन्मानाची चौकट असू शकते—ही सामाजिक समज विकसित होणे गरजेचे आहे. शेवटी प्रश्न स्त्री-पुरुष मैत्रीचा नाही; प्रश्न आहे आपल्या नजरेचा.

आपण नात्याकडे विश्वासाने पाहतो की संशयाने?

आपण तथ्य तपासतो की अफवांवर विश्वास ठेवतो? आपण व्यक्तीच्या कामाकडे पाहतो की तिच्या वैयक्तिक आयुष्याचा अर्थ लावतो? कधी कधी नातं चुकीचं नसतं; नात्याकडे पाहण्याची नजर चुकीची असू शकते. म्हणूनच स्त्री-पुरुष मैत्रीला संशयाच्या चौकटीत अडकवण्याऐवजी नात्यांमध्ये मर्यादा, पारदर्शकता, आदर आणि विश्वास यांना महत्त्व देऊया. समाजकार्याच्या क्षेत्रात व्यक्तीचे मूल्यमापन तिच्या कामावरून करूया. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे—इतरांकडे बोट दाखवण्यापूर्वी स्वतःच्या विचारांची, वर्तनाची आणि दृष्टिकोनाची एकदा तपासणी करूया.

कारण खरे परिवर्तन केवळ समाज बदलण्यापासून सुरू होत नाही; ते स्वतःच्या नजरेत बदल करण्यापासून सुरू होते.ते विचारात घेऊन खरं आत्मचिंतनाची गरज आहे.



प्रफुल्ल मंदा श्रीधर
सामाजिक कार्यकर्ता
मो. न. 9665185428

# गायन नव्हे, अभिनयातून सुरुवात करणाऱ्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर!

## आज लता मंगेशकर यांची जयंती



आपल्या सुरेल आवाजाने अनेक पिढ्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांची आज, २८ सप्टेंबर रोजी जयंती आहे. लता मंगेशकर आज आपल्यात नसल्या, तरी त्यांची गाणी आजही प्रत्येकाच्या मनात घर करून आहेत. हिंदीसह अनेक भाषांमध्ये गाणी गाऊन त्यांनी संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, तुम्हाला माहिती आहे का? लता मंगेशकर यांना सुरुवातीला गायिका नव्हे, तर अभिनेत्री व्हायचे होते. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी त्यांनी रंगभूमीवर पाऊल ठेवले होते. अभिनयाची आवड असलेल्या या मुलीचा प्रवास पुढे स्वरसम्राज्ञी होण्यापर्यंतचा मोठा रंजक आहे.

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे प्रसिद्ध गायक आणि रंगभूमीवरील कलाकार होते. त्यांच्या आईचे नाव शेवंती (माई) मंगेशकर होते. लता यांचे जन्माच्या वेळी हेमा असे नाव ठेवण्यात आले होते. मात्र, काही काळानंतर त्यांच्या वडिलांनी एका नाटकातील लतिका या पात्रावरून त्यांचे नाव लता ठेवले. लहानपणापासूनच त्यांना संगीत आणि अभिनयाची आवड होती. वडिलांकडून त्यांना संगीताचे संस्कार मिळाले. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी त्यांनी पहिल्यांदा नाटकात अभिनय केला. त्यामुळे त्यांचा रंगभूमीशी अगदी लहान वयातच संबंध आला.

लता मंगेशकर यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांचे निधन झाले, तेव्हा त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या. वडिलांच्या निधनानंतर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. घराला आर्थिक हातभार लावण्यासाठी त्यांनी चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी चित्रपटांमध्ये अभिनेत्रीच्या बहिणीच्या भूमिका साकारल्या. अभिनयासोबतच त्यांचे संगीताचे शिक्षणही सुरू होते. पुढे त्यांनी गायनाच्या क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आणि त्यातूनच त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले. लता मंगेशकर यांनी वयाच्या १३व्या वर्षी 'पहिली मंगळागौर' या मराठी चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर १९४२ मध्ये 'किती हसाल' या मराठी चित्रपटासाठी त्यांनी पहिले गाणे गायले. या गाण्यासाठी त्यांना २५ रुपये मिळाले होते.

सुरुवातीच्या काळात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, त्यांनी मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर आपला प्रवास सुरू ठेवला. 'महल' चित्रपटातील 'आएगा आने वाला' या गाण्यामुळे त्यांना मोठी ओळख मिळाली. पुढे त्यांनी अनेक अजरामर गाणी गायली. भारतरत्न लता मंगेशकर या भारतातील एक प्रसिद्ध गायिका आणि संगीतकार होत्या. त्यांना 'गानकोकिळा' आणि 'स्वरसम्राज्ञी' म्हणून ओळखले जाते. त्यांना आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना खडीकर आणि हृदयनाथ मंगेशकर ही भावंडे होती. लहानपणी वडिलांच्या शिष्याची संगीतातील चूक त्यांनी पकडली होती, तेव्हापासून त्यांच्यातील संगीतकार हळूहळू घडत गेला. १९६३ मध्ये दिल्लीत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम/रामलीला मैदानावर ऐकवलेले 'ऐ मेरे वतन के लोगों' हे देशभक्तिपर गीत ऐकून देशाचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यात पाणी आले होते. लता मंगेशकर यांना आयुष्यात अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. मात्र, त्यांची खरी ओळख त्यांच्या गाण्यांमधूनच निर्माण झाली. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सुरेल आवाजाच्या आठवणी पुन्हा ताज्या होत आहेत. अभिनयाची आवड असलेल्या एका छोट्या मुलीने आपल्या मेहनतीने आणि प्रतिभेने संगीतविश्वात अढळ स्थान निर्माण केले. लता मंगेशकर यांची गाणी आणि त्यांचा आवाज येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या मनात कायम घुमत राहील.

### वडील असते तर कदाचित गायिका झाले नसते!

लता मंगेशकर यांनी एका मुलाखतीत आपल्या वडिलांविषयी एक खास आठवण सांगितली होती. त्या म्हणाल्या होत्या की, वडील जिवंत असते तर कदाचित आपण गायिका झाले नसते. दीनानाथ मंगेशकर यांना आपल्या मुलीला गाता येते, हे सुरुवातीला माहीत नव्हते. जेव्हा ते लता यांना गाण्यास सांगत, तेव्हा त्या लाजून स्वयंपाकघरात आईकडे पळून जात असत. वडिलांसमोर गाताना त्यांना नेहमीच संकोच वाटत असे.

### शाळेत गेल्या होत्या फक्त एक दिवस

लता मंगेशकर यांच्या आयुष्यातील आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे त्या शाळेत केवळ एक दिवस गेल्या होत्या. लता आपल्या धाकट्या बहिणी आशा भोसले यांना शाळेत घेऊन गेल्या होत्या. मात्र, आशा यांना शाळेत प्रवेश देताना त्यांची फीही भरावी लागेल, असे शिक्षकांनी सांगितले. त्यानंतर लता यांनी शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला. औपचारिक शिक्षण कमी असले, तरी पुढे त्यांना अनेक विद्यापीठांकडून मानद पदव्या देऊन गौरवण्यात आले. त्यांच्या कुटुंबातील बहिणी आणि भाऊ यांनीही संगीत क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली.

### ३६ भाषांमध्ये गायली हजारो गाणी

लता मंगेशकर यांनी आपल्या कारकिर्दीत हिंदी, मराठीसह अनेक भाषांमध्ये गाणी गायली. त्यांनी ३६ भाषांमध्ये ५० हजारांहून अधिक गाणी गायल्याचे सांगितले जाते. १९७४ मध्ये लंडनच्या रॉयल अल्बर्ट हॉलमध्ये गाण्याची संधी मिळालेल्या त्या पहिल्या भारतीय गायिका ठरल्या. १९७४ मध्ये सर्वाधिक गाणी गाण्याचा विव्रâमही त्यांच्या नावावर नोंदवण्यात आला होता. त्यांच्या आवाजाने देश-विदेशातील लाखो चाहत्यांना भुरळ घातली.

### प्रमुख सन्मान आणि पुरस्कार

दादासाहेब फाळके पुरस्कार १९८९, पद्मभूषण १९६९, पद्मविभूषण १९९९, भारत रत्न २००१ (भारताचा सर्वोच्च नागरिक सन्मान), २००७ मध्ये प्रâान्सचा सर्वोच्च नागरिक सन्मान 'ऑफिसर ऑफ लीजन ऑफ ऑनर' प्रदान करण्यात आला.

# प्रशासनाला अधिक पारदर्शी करणारा माहितीचा अधिकार अधिनियम 2005

२८ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'माहितीचा सार्वत्रिक प्रवेश दिन' म्हणून पाळला जातो. माहिती मिळणे हा केवळ प्रशासकीय सोयीचा विषय नसून लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा, शासनाच्या उत्तरदायित्वाचा आणि पारदर्शकतेचा महत्त्वपूर्ण आधार आहे. याच जाणिवेचा विस्तार भारतात 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५'च्या माध्यमातून झाला. आता हा कायदा आपल्या २१व्या वर्षात पदार्पण करत आहे. प्रशासनात पारदर्शकता ठेवणे व अभिलेखे उत्तम प्रकारे जतन करणे याची शिस्त या कायद्याने लावली आहे. सोबतच या देशाच्या सामान्य नागरिकांना आम्ही जबाबदार आहोत, याची जाणीव प्रशासनाच्या प्रत्येक स्तराला करून देण्यात या कायद्याला यश आले आहे.

### २८ सप्टेंबरचे कायद्यामध्ये महत्त्व

माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी युनेस्कोच्या सर्वसाधारण परिषदेने २०१५ मध्ये २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन (International Day for Universal Access to Information) म्हणून घोषित केला. त्यानंतर ऑक्टोबर २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या ७४व्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि सार्वत्रिक प्रवेश हा सुजाण निर्णयप्रक्रिया, लोकशाही, समावेशकता आणि उत्तरदायी संस्था यांच्यासाठी आवश्यक असल्याचे युनेस्को नमूद करते.

### माहितीच्या अधिकाराची जागतिक वाटचाल

माहितीच्या अधिकाराची संकल्पना आधुनिक काळात सर्वप्रथम कायद्याच्या स्वरूपात स्वीडनमध्ये २ डिसेंबर १७६६ रोजी अस्तित्वात आली. स्वीडिश फ्रीडम ऑफ द प्रेस ऑर्डिनन्स (Freedom of the Press Ordinance) हा सार्वजनिक माहितीपर्यंत प्रवेशाची हमी देणारा जगातील पहिला कायदा मानला जातो. भारतामध्ये मात्र या अधिकारामागची वाटचाल सामाजिक चळवळी, लोकशाही मूल्ये आणि प्रशासनातील पारदर्शकतेच्या मागणीशी जोडलेली आहे.

### २००५ : देशव्यापी कायद्याचा निर्णायक टप्पा

केंद्र सरकारने यापूर्वी फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन ॲक्ट (Freedom of Information Act, 2002) केला होता. मात्र अधिक प्रभावी, सहभागी आणि अर्थपूर्ण माहिती अधिकाराची गरज लक्षात घेऊन तो कायदा बाजूला ठेवून नवा कायदा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. माहितीचा अधिकार विधेयक २३ डिसेंबर २००४ रोजी लोकसभेत मांडण्यात आले. दोन्ही सभागृहांनी मे २००५ मध्ये ते मंजूर केले. राष्ट्रपतींची संमती १५ जून २००५ रोजी मिळाली, अधिनियमाचे राजपत्रात प्रकाशन २१ जून २००५ रोजी झाले आणि १२ ऑक्टोबर २००५ रोजी हा कायदा पूर्णपणे लागू झाला. त्यामुळे सप्टेंबर २०२६ मध्ये देशव्यापी माहिती अधिकार कायद्याला २० वर्षे पूर्ण होऊन २१व्या वर्षात प्रवेश झाला आहे. महाराष्ट्रात केंद्रीय अधिनियमाची अंमलबजावणीही १२ ऑक्टोबर २००५ पासूनच झाली. त्याआधी राज्याचा स्वतंत्र २००२ चा कायदा अस्तित्वात होता.

### 'हमारा पैसा, हमारा हिसाब' ते माहितीचा अधिकार

राजस्थानातील 'मजदूर किसान शक्ती संघटने'च्या आंदोलनाने भारतातील माहिती अधिकार चळवळीला व्यापक लोकाधार मिळवून दिला. अरुणा रॉय, निखिल डे आणि शंकर सिंह यांच्यासह कार्यकर्त्यांनी गावकऱ्यांच्या विकासकामांवरील खर्चाची नोंद, मजुरीची माहिती आणि सरकारी अभिलेख लोकांसमोर आणण्याची मागणी केली. 'आमचा पैसा, आमचा हिशेब' ही भूमिका या चळवळीच्या केंद्रस्थानी होती. सरकारी कामात आपले श्रम आणि पैसा वापरला जात असेल तर त्या कामाचा हिशेब जाणून घेण्याचा नागरिकांना अधिकार असावा, या साध्या प्रश्नातून ही चळवळ उभी राहिली. या चळवळीच्या अनुभवातून राष्ट्रीय पातळीवर नॅशनल कॅम्पेन फॉर पीपल्स राईट टू इन्फॉर्मेशन (National Campaign for People's Right to Information (NCPRI)) ची स्थापना १९९६ मध्ये झाली. अरुणा रॉय आणि निखिल डे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ज्ञ, पत्रकार आणि नागरी समाजातील व्यक्तींनी माहितीच्या अधिकारासाठी राष्ट्रीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला. महाराष्ट्रातही माहितीच्या अधिकाराच्या मागणीला सामाजिक चळवळींचा आधार मिळाला. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पारदर्शक प्रशासनासाठी झालेल्या आंदोलनांनी माहितीच्या अधिकाराच्या मागणीला जनमानसात स्थान मिळवून दिले. महाराष्ट्राने २००२ मध्ये स्वतंत्र माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून एक महत्त्वाचे पाऊल उचलले. १० ऑगस्ट २००२ रोजी त्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली होती.

### यंदाचा विशेष उपक्रम

२०२६ मध्ये महाराष्ट्रात माहिती अधिकार दिन अधिक व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून साजरा करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीच्या अधिकारावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, तसेच चर्चासत्रे आणि व्याख्यानमाला आयोजित करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमातून माहितीचा अधिकार हा केवळ अर्ज करण्यापुरता कायदा नसून लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणारे नागरिक शिक्षण आहे, हा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे.

### पारदर्शक प्रशासनाकडे वाटचाल

माहितीचा अधिकार म्हणजे शासन आणि नागरिक यांच्यातील अविश्वासाची भिंत उभी करणे नव्हे; उलट विश्वासाचा पाया अधिक भक्कम करणे होय. माहिती उपलब्ध असेल तर प्रश्न अधिक नेमके होतात, प्रशासनाला आपल्या निर्णयांचे कारण स्पष्ट ठेवावे लागते आणि नागरिकांचा शासनप्रक्रियेतील सहभाग वाढतो. गेल्या दोन दशकांत माहितीच्या अधिकाराने सामान्य नागरिकाच्या हातात प्रशासनाच्या दाराची किल्ली दिली आहे. ही किल्ली जबाबदारीने वापरली तर ती केवळ एखाद्या फाईलचा दरवाजा उघडत नाही; ती प्रशासनातील पारदर्शकतेची खिडकी उघडते. या कायद्याचा वापर लोकशाहीत सत्ता जनतेकडून येते आणि प्रशासन जनतेसाठी काम करते. त्यामुळे शासनाच्या कामकाजाची माहिती जनतेला उपलब्ध असणे ही लोकशाहीची नैसर्गिक गरज आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाने या गरजेला कायदेशीर बळ दिले आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग या तीन आधारस्तंभांवर उभे राहणारे प्रशासन अधिक सक्षम, संवेदनशील आणि लोकाभिमुख होण्यासाठी माहितीचा अधिकार महत्त्वाची भूमिका बजावत आहे. म्हणूनच २८ सप्टेंबरचा माहिती अधिकार दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा प्रसंग नाही; तर 'शासनाची माहिती जनतेपासून लपविण्याची नव्हे, ती कायद्याच्या चौकटीत जनतेपर्यंत पोहोचविण्याची' लोकशाही बांधिलकी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे. पारदर्शक प्रशासन हीच सुशासनाची खरी ओळख आहे.

### नागरिकांच्या हातातील प्रभावी साधन

माहितीचा अधिकार अधिनियमामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडील अभिलेख, दस्तऐवज, आदेश, अहवाल, करार, नोंदी आदींबाबत माहिती मागण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. अर्जदाराला माहिती का हवी आहे, याचे कारण देणे कायद्याने आवश्यक नाही. साधारणपणे माहिती देण्यासाठी ३० दिवसांची मुदत आहे; जीवन किंवा स्वातंत्र्याशी संबंधित माहिती ४८ तासांत देण्याची तरतूद आहे. माहिती न मिळाल्यास प्रथम अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील किंवा तक्रारीची व्यवस्था आहे. माहिती देण्यात कायद्यातील अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दररोज २५० रुपये, कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. यामुळे नागरिकाला 'शासन काय करते?' हा प्रश्न विचारण्याबरोबरच 'शासनाने कोणत्या नोंदीच्या आधारे निर्णय घेतला?' हे जाणून घेण्याची कायदेशीर संधी मिळाली.

### प्रशासनात झालेला बदल

माहिती अधिकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर दोन प्रकारे परिणाम झाला. पहिला म्हणजे उत्तरदायित्व—निर्णय, आदेश आणि अभिलेख व्यवस्थित ठेवण्याची गरज वाढली. दुसरा म्हणजे स्वयंप्रेरित माहिती प्रकटीकरण. कायद्याच्या कलम ४ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांनी अनेक बाबी स्वतःहून प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगानेही कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी, संकेतस्थळांवर माहिती अद्ययावत ठेवणे आणि अभिलेखांचे संगणकीकरण यावर सातत्याने भर दिला आहे. आज ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन अर्ज, डिजिटल अभिलेख, संकेतस्थळांवरील १७ बाबींचे प्रकटीकरण आणि ऑनलाइन अपील यामुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. महाराष्ट्र शासनाचे ऑनलाइन RTI पोर्टल नागरिकांना अर्ज व प्रथम अपील ऑनलाइन दाखल करण्याची सुविधा देते.

### वापर आणि गैरवापराची चर्चा

घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घटना समिती समोर भाषण करताना एक बाब अधोरेखित केली होती. ते म्हणाले होते, "ही घटना भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत उपयुक्त करू शकते मात्र,याचा वापर कोण करते आणि देशहितासाठी किती आपुलकीने करते यावर आपल्या देशाचे भविष्य राहील " हा कायदा ही अशाच प्रकारे पारदर्शी लोकप्रशासनासाठी अधिक सक्रियतेने वापरणे गरजेचे आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीतील प्रभावी नागरिक-साधन आहे; मात्र त्याचा वापर कायद्याच्या उद्देशाशी सुसंगत असणेही तितकेच आवश्यक आहे. वैयक्तिक स्वरूपाची, व्यापक जनहिताशी संबंध नसलेली माहिती किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे अस्तित्वात नसलेली नवी माहिती निर्माण करून देण्याची अपेक्षा कायद्याच्या चौकटीत येत नाही. त्यामुळे अधिकाराचा वापर करताना तथ्याधारित, नेमकी आणि सार्वजनिक कामकाजाशी संबंधित माहिती मागणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. प्रशासनानेही कायद्यातील अपवादांचा अवाजवी विस्तार न करता पात्र माहिती वेळेत उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

### कायद्यातील काही महत्वाचे बदल

केंद्रीय पातळीवर RTI Rules, 2012 लागू झाले. त्यानंतर २०१९ मध्ये अधिनियमात महत्त्वाची सुधारणा करून केंद्रीय व राज्य माहिती आयुक्तांच्या पदावरील कार्यकाळ, वेतन, भत्ते आणि सेवा अटी केंद्र शासनाने नियमांद्वारे निश्चित करण्याची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्राने आता आणखी एक अद्ययावत पाऊल टाकले असून 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' दिनांक ७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झाले आहेत. ऑनलाइन RTI प्रणालीवर त्याची अधिकृत नोंद उपलब्ध आहे.

### महाराष्ट्रातील माहिती आयोगाची व्यवस्था

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाची स्थापना १२ ऑक्टोबर २००५ रोजी झाली. आयोगात मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्तांची व्यवस्था आहे. सध्या श्री. राहुल भालचंद्र पांडे हे मुख्य माहिती आयुक्त आहेत. विभागीय पातळीवर बृहन्मुंबई येथे डॉ. प्रदीप व्यास, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे श्री. मकरंद मधुसूदन रानडे, नाशिक व कोकण येथे श्री. प्रकाश शामराव इंदलकर यांच्याकडे आहे. अमरावती येथे श्री. रविंद्र हनुमंतराव ठाकरे आणि नागपूर येथे श्री. गजानन श्रीधर निमदेव कार्यरत आहेत. राज्य शासनाने अनुभवी आणि कर्तव्यदक्ष व्यक्तींची या पदावर नेमणूक केल्यामुळे आयोगाची प्रलंबितता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अशा प्रकारे मुंबई मुख्यालयासह सात विभागीय कार्यक्षेत्रांत आयोगाची सुनावणी व्यवस्था उपलब्ध आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर मासिक निकाली प्रकरणांचे अहवाल, निर्णय आणि सुनावणी तक्तेही प्रसिद्ध केले जातात.

प्रवीण टाके
उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर मो. ९७०२८५८७७७

# मूर्तिजापूर येथे नागपूर कराराची होळी वेगळा विदर्भ झालाच पाहिजेच्या घोषणा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेला नागपूर करार ७३ वर्षानंतरही पाळला गेला नाही. विदर्भावर सातत्याने होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ आज विदर्भातील १२० तालुक्यात एकाच वेळी "नागपूर कराराची होळी" करण्यात आली.

त्याचाच एक भाग म्हणून विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष मा. अॅड. वामनराव चटप (माजी आमदार) यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. सुरेशभाऊ जोगळे



(माजी सैनिक), माजी जिल्हाध्यक्ष, अकोला यांच्या नेतृत्वात मूर्तिजापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर नागपूर कराराच्या प्रती जाळून होळी करण्यात आली.

या वेळी "वेगळा विदर्भ झालाच पाहिजे, जो विदर्भ विकेल त्याला जमिनीत गाडू, नागपूर कराराचा धिक्कार असो" अशा जोरदार घोषणा देऊन मूर्तिजापूर दणाणून सोडण्यात आले. या आंदोलनात अरविंद तायडे (जिल्हा समन्वयक), . रामचंद्र तायडे, विजयभाऊ लोडम, . प्रा. सुधाकरराव गौरखेडे , गुलाबराव पाटील म्हसाये, श्रीकृष्ण कोळसकर, . बाळासाहेब तायडे, बाळासाहेब देशमुख, बाळासाहेब खांडेकर, शिवदास राऊत, प्रदीप डांगे, अॅड. वामनराव वानखडे, सचिन तांबडे, मा. रामू भगत, श्रीमती सुनीता गावंडे, सुनीता इंगळे, सुधाकर गोंडसे यांच्यासह शेकडो विदर्भ प्रेमी, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढती महागाई आणि बेरोजगारीत शेतमजुरांचा वाली कोण?

## सण उत्साहात करावी लागते तारेवरची कसरत

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**तेल्हारा :** सरकारने गरीबांसाठी राशन योजना आणि लाडकी बहीण योजना सुरू केल्या आहेत.पण खरंच लाडकी बहीण योजनेच्या पैशांमध्ये दैनंदिन मुलभूत गरजा आणि मुलाबाळांच्या शैक्षणिक गरजा पुर्ण होऊ शकतात का? कारण शेतमजुरी करणारा वर्ग शेतीतील आधुनिक यंत्रणेमुळे दिवसेंदिवस बेरोजगार होत चालला आहे.अशातच सण-उत्सवांच्या काळात बेरोजगारी आणि आर्थिक संकट हा आपल्या समाजातील एक अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय असल्याने जेव्हा संपूर्ण देश दिव्यांच्या प्रकाशात, नवीन कपड्यांमध्ये आणि गोडधोडाच्या आनंदात बुडालेला असतो, तेव्हा बेरोजगार शेतमजूर आणि त्यांच्या कुटुंबांच्या मनात एक वेगळीच अस्वस्थता असते.शेतमजुरांना खुप कमी समजुन घेतल्या जाते हे वास्तव आहे.



अनेक प्रकारचे गैरसमज शेतमजरांबाबत पसरवले जातात परंतु ज्यावेळी मजुरी अभावी त्यांची चुल पेटत नाही त्यावेळचे चित्र बघायला फक्त घरातील चार भिंती आणि कटुंबातील भुकेने कासावीस झालेले चेहरेच असतात.एक बाजु मान्य केली की शेतमजूर त्यांचं कुटुंब काहीतरी काबाडकष्ट करुन एकवेळचा तरी घास उपलब्ध करून देईल पण गरजा इथेच संपत नाहीत.कारण बाबासाहेबांनी गाडगेबाबांनी आणि ज्योतीबांनी जो शिक्षणावर भर दिला त्याविचारांचे पाईक होईन आपल्या मुलाबाळांना शिक्षण देणं हे गरज सुद्धा शेतमजूर पालकांना अत्यंत महत्वाची आहे. परंतु जिथं बेकारी आणि महागाई मुळे पोटाची खळगी भरणे हलाखीचे झाले तीथं शिक्षणाचा विचार कसा केल्या जाणार..? त्यामुळे शेतमजुरांबाबत नकारात्मक मतं मांडण सोपी आहे पण वास्तव बघण्यासाठी एकदा तरी त्यांच्या चुलीची भेट घेणं महत्त्वाचं आहे. सद्यस्थितीत सरकारने शेतकऱ्यांसाठी दुष्काळ जाहीर केला.

# हिवरखेड येथे दोन दिवसीय गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत संपन्न

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**हिवरखेड :** येथे दोन दिवसीय गणेश उत्सव विसर्जन रथयात्रा व मिरवणूक शांततेत पार पडली. लाडक्या गणरायाला भक्तांनी मोठ्या उत्साहात निरोप दिला. मिरवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या मिरवणुकीत एकूण 13 गणेश उत्सव मंडळांनी सहभाग नोंदविला. श्री गजानन महाराज संस्थान (मानाचा गणपती), चंडिका माता गणेशोत्सव मंडळ, मोठे बारगण गणेश उत्सव मंडळ, सिद्धिविनायक गणेशोत्सव मंडळ, श्री मोठा महादेव संस्थान



## १३ मंडळांचा सहभाग

गणेशोत्सव मंडळ, विजयनगर भवानी माता गणेशोत्सव मंडळ, इंदिरानगर जय गणेश उत्सव मंडळ, श्री शिवराय गणेशोत्सव मंडळ, मढीपुरा, श्री शंकर संस्थान देवळीवेश गणेश उत्सव मंडळ, श्री फत्तेपुरी संस्थान गणेश उत्सव मंडळ, दाईबुवा गणेश उत्सव मंडळ, खारनपुरा, स्वस्तिक कॉलनी स्वस्तिक ग्रुप गणेशोत्सव मंडळ, जय शिवाजी गणेशोत्सव मंडळ, मराठा नगर मिरवणूक दरम्यान दानशूर भाविकांच्या वतीने गणेश भक्तांना फराळाचे वितरण करण्यात आले. हीढोल-ताशांच्या गजरात भाविकांनी नाचत-गाजत बाप्पाला निरोप दिला.

# दुष्काळात निर्गुणा धरणातील पाण्याचा अपव्यय



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**आलेगाव :** येथील चोंढी निर्गुणा प्रकल्पाचे पाणी शेत सिंचना करीता ज्या दरवाज्यातून मोठ्या मायनर मध्ये पाणी सोडले जाते,त्याच दरवाजातून गेल्या काही दिवसांपासून मोठ्या मायनर मध्ये पाण्याचा अपव्यय सुरू आहे. सदर लिकेज् आहे की ह्या लिकेजवर हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्या जात आहे.असा प्रश्न शेतकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे.तरी संबंधित प्रशासनाने वेळीच दखल घेऊन होणाऱ्या पाण्याचा अपव्यय तात्काळ थांबवावा अशी मागणी आहे.

## संतोषी माता मंदिरासमोरील रस्त्याची दुरवस्था

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** शहरातील अग्रसेन चौक ते संतोषी माता मंदिर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे त्याची चाळणी झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांना या मार्गावरून जाताना अक्षरशः गतिरोधकावरून जात असल्याचा अनुभव येत आहे. याचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांना होत आहे. या मार्गावर अनेक शाळा, महाविद्यालये असल्यामुळे नेहमीच वाहनांची वर्दळ राहते. या समस्येकडे लक्ष देऊन यामार्गाची दुरूस्ती करण्याची मागणी वाहनधारकांसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे. गेल्या काही दिवसांपासून हा रस्ता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरला आहे.

# लोटस स्कूल शालेय जिल्हास्तरीय आट्या-पाट्या स्पर्धेत विजयी




प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय आट्या-पाट्या स्पर्धेत (अंडर-१४ गट) उत्कृष्ट खेळ करत लोटस स्कूलच्या संघाने 'प्रथम क्रमांक' पटकावला. या घवघवीत यशामुळे संघाने विभागीय स्पर्धेकरिता बाजी मारली आहे!

कर्णधार अयुक्त शिंदे आणि उपकर्णधार राजवीर सरोदे यांच्यासह ऋग्वेद हिरवे, रघुवीर देशमुख, जाहेद खान, मोहम्मद जहेद, गौरव आठवल, आतिफ खान, अवेज शाह, राजवीर हत्तीमारे, विराट आळेकर आणि साहिल तेलगोटे या सर्व खेळाडूंनी अत्यंत जिद्दीने ही कामगिरी फत्ते केली.

फाउंडर विक्रम शर्मा व को-फाउंडर रश्मी शर्मा, प्राचार्य भावना मॅकवान, प्रशिक्षक रोहन शेळके यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

# जिल्हा परिषद गांधी विद्यालयात शासकीय चित्रकला परीक्षेला प्रतिसाद



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**हिवरखेड :** हिवरखेड येथील जिल्हा परिषद महात्मा गांधी विद्यालयात महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय चित्रकला श्रेणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल ७०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत प्रथम पेपर घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयानुसार चित्रकला साकारत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रकलेतील रेखाटन, कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलता विकसित करण्याची संधी मिळत आहे. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# शहरात डासांच्या संख्येत वाढ

**अकोला :** पाऊस नसल्याने वातावरणावर परिणाम झाला आहे. डासांच्या संख्येत वाढ झाली आहे. सायंकाळी डासांचा खूप त्रास होतो. परिसर स्वच्छता महत्त्वाची आहे. महापालिकेकडून फवारणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. आजाराचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढलेली दिसत आहे.

# SIR ला विरोध म्हणजे पारदर्शक मतदार यादीला विरोध का? -मनीष गावंडे

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेल्या एस आय आर प्रक्रियेवरून विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांवर भाजपा जिल्हा SIR प्रभारी तथा भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली.

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे एकटे संपूर्ण देशात SIR कसे करू शकतात? या प्रक्रियेमध्ये सहभागी होणारे शिक्षक, अधिकारी आणि काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर आरोप करून त्यांच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे चुकीचे आहे. या कामात सर्व जाती-धर्माचे अधिकारी-कर्मचारी सहभागी होऊन काम करतात, त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याचा व त्यांचा अपमान करण्याचा अधिकार राहुल गांधी आणि काँग्रेसला कोणी दिला, असा सवाल गावंडे यांनी उपस्थित केला.



केवळ गप्पांचा बाजार करणे, खळबळ माजवण्यासाठी दर दोन महिन्यांनी वेगवेगळे मुद्दे उपस्थित करणे आणि नंतर माफी मागणे हा प्रकार राहुल गांधी आणि काँग्रेस सातत्याने करत आहेत. चौकीदार, वि.दा. सावरकर यांसारख्या अनेक प्रकरणांवरून हे सिद्ध झाले आहे. सध्या जनतेचा विश्वास गमावलेले उद्धव ठाकरे, राज ठाकरे, ममता बॅनर्जी यांसारखे नेते एकत्र येऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असले तरी जनता त्यांना माफ करणार नाही. कार्यकर्ते मिळत नाहीत म्हणून कर्मचाऱ्यांवर अविश्वास दाखवणे, त्यांच्या मेहनतीवर टीका करणे हे कोणत्या संविधानात लिहिले आहे? हा संविधानाचा अपमान असून घटनाशिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गाचा अपमान करण्याचा प्रयत्न काँग्रेस बाबासाहेब आंबेडकर असतानापासून सातत्याने करत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

मात्र, काँग्रेस पक्षाने सुमारे 50 टक्के मतदान केंद्रांवर अद्याप BLA-2 नियुक्त केलेले नसल्याचा दावा मनिष गावंडे यांनी केला. जर काँग्रेसला SIR प्रक्रियेबाबत खरोखरच आक्षेप असतील, तर प्रत्येक बूथवर आपला अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करून मतदार यादीची पडताळणी करण्याची संधी काँग्रेसने का घेतली नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

SIR बाबत आक्षेप घेणाऱ्यांनी केवळ आरोप न करता नेमका कोणता पात्र मतदार वगळला गेला, कोणत्या प्रक्रियेत त्रुटी झाली आणि त्याबाबतचे ठोस पुरावे काय आहेत, हे जनतेसमोर मांडावे. त्याचबरोबर प्रत्येक बूथवर BLA नियुक्त करून प्रक्रियेतील सहभाग वाढवावा.

काँग्रेसने SIR ला विरोध करण्यापेक्षा प्रत्येक बूथवर BLA-2 नियुक्त करून प्रक्रियेवर लक्ष ठेवावे आणि काही त्रुटी असल्यास त्या अधिकृतरित्या निदर्शनास आणाव्यात. जनतेसमोर आरोप करण्यापूर्वी स्वतःची बूथस्तरीय यंत्रणा सक्रिय करण्याची जबाबदारी काँग्रेसचीही आहे, असे मनिष गावंडे यांनी नमूद केले.

# श्री संताजी शाळेची विद्यार्थीनी ठरली जिल्हास्तरीय अव्वल कुस्तीपटू

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** जिल्हा क्रिडा परिषद कार्यालयातर्फे आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत विद्याभारती विदर्भ सलग्नित श्री संताजी इंग्लीश प्रायमरी व मिडल स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज येथील कु. सिद्धी विनोद मराठे या विद्यार्थीनीने कुस्ती या खेळात वयोगट १४ मधुन प्रथम क्रमांक मिळविला तिची विभागीय स्तरावर निवड झाली.



या उत्लेखनीय कामगीरी बद्दल तिचे कौतुक संपूर्ण जिल्हामध्ये होत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय श्री संताजी इंग्लीश प्रायमरी व मिडल स्कुल आणि ज्यु. कॉलेजचे अध्यक्ष मा. श्री. मंगेशजी वानखडे साहेब. शाळेच्या मार्गदर्शिका. कु. ज्योती फंडाट ताई, अश्विनी खोत ताई, मंजुषा देशमुख ताई, क्रिडा शिक्षक मा. श्री विठ्ठल नांदुरकर सर व शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री अमोल राठोड सर व शाळेचे शिक्षकवृंद व कर्मचारी तसेच संत गाडगेबाबा कुस्ती केंद्राचे राजेंद्र गोतमारे यांना दिले.

# प्रा.डॉ.चंद्रकिरण राठोड यांना आचार्य पदवी बहाल

**मुर्तिजापूर :** येथील प्रा. डॉ.चंद्रकिरण रविकिरण राठोड यांना नुकतीच वनस्पतीशास्त्र विभागातील " इकॉलॉजिकल इन्वेस्टीगेशन ऑफ फ्लूरिस्टिक डायव्हर्सिटी विथ रिस्पेक्ट टू काटेपूर्णा वाईल्ड लाईफ सेंचुरी महाराष्ट्र स्टेट " या विषयावरील महत्त्वपूर्ण संशोधनासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारे आचार्य (पीएच.डी) ही मानाची पदवी बहाल झाली आहे. प्रा.सी.आर. राठोड यांनी डॉ. आर. जी.राठोड कला व विज्ञान महाविद्यालय,मुर्तीजापुर येथील सहयोगी प्राध्यापक डॉ.आर.



पी. शिरसाट यांच्या मार्गदर्शनात सदर आचार्य पदवी प्राप्त केली आहे. स्थानिक भारतीय ज्ञानपीठ कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक पदावर कार्यरत असतांना, एक अभ्यासू,चिकित्सक आणि लोकप्रिय प्राध्यापक म्हणून ते परिचयाचे आहेत. पण त्यांच्यातील संशोधक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता, म्हणून नोकरी असतांनाही आपली आवड जपत त्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली आहे. सदर संशोधनासाठी त्यांना आई-वडील, पत्नी आणि मुलगी यांनी नेहमी आत्मिक बळ दिले. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबासह, भारतीय ज्ञानपीठ कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष मनोहरराव पाठक,उपाध्यक्ष ज. दा. शहापूरकर, सचिव संतोष पाठक, कोषाध्यक्ष मिलिंद बंदिष्टे, तसेच सहसचिव कल्पक बंदिष्टे व समस्त संचालक मंडळ यांना दिले आहे.

# टाळ मृदुंगाच्या निनादात पळसोद गावात मारुती यात्रा महोत्सव

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोट :** अकोला रोडवरील पळसोद गावामध्ये मारुती महाराजांच्या यात्रा महोत्सवाची सुरुवात सन १८३८ च्या काळात झाली. गावात पाऊस नसल्यामुळे कोरडा दुष्काळा पासून गाव वाचले पाहिजे म्हणून गावकऱ्यांनी मारुती संस्थानमध्ये अखंड हरिनाम सप्ताह केला. गोपाल काला करताना सात दिवसात पाऊस आला. त्यावेळेस पासून परंपरा गावकरी जोपासत आहे. यात्रा उत्सवामध्ये अखंड हरिनाम, महाप्रसादाची प्रथा १८८ वर्षापासून सुरू आहे.

मारुती संस्थानमध्ये तीर्थस्थापना विधिवत पद्धतीने होऊन सजवलेल्या पालखीमध्ये मारुती महाराजांचा फोटो विराजमान करून पालखीमध्ये कापुराचा दिवा लावतात. आकर्षण रांगोळ्या व





## मिरवणुकीत दोन मारुतीराया, अस्वल पालखी आकर्षण

सजावट मुख्य रोडवरून गाव प्रदक्षिणा करतात. भजनी महिला मंडळ, पावल्या, पथनाट्य फुगड्यांच्या आनंद अप्रतिम डोळ्याचे पारणे फेडणारा असतो. महाराजांचा जयजयकार करत डफडयांचा नाद ढोल नगारे व झांजच्या गजराच्या तालावर भाविक भक्त तल्लीन दिंडीमध्ये आनंद घेतला. पालखी पूजा करून लहान बाळांना महाराजांचा प्रसाद धूप अंगारा घेण्याकरता पालखी खालून लोटांगण घेत आशीर्वाद घेतात. मिरवणुकीमध्ये महाकाय सजवलेले दोन मारुती व विक्राळ अस्वल त्यांचे विविध प्रकारचे नृत्य चौका चौकामध्ये पाहणाऱ्यांचे लक्षवेधी ठरले होते. मिरवणूक गावामधून वाजत गाजत मंदिर परिसरात आल्यावर सर्व भाविकांच्या उपस्थितीत पाच आरत्या झाल्या. आरती ओवाळत सर्वांना धूप अंगारा घेत भाविकांची मनोकामना पूर्ण झालेली भाविक दह्याचे हांडे पेढे मूरमुरे लाया गुळ पोहे अशा या महाप्रसादांचा मंदिराच्या दुसऱ्या वरून उधळण करतात. मुख्य रोडवर पंचक्रोशीतील आलेले भाविक हजारोच्या संख्येने पंगत बसून जेवण महाप्रसाद घेतात यावर्षी महाप्रसादाच्या सायंकाळी पंगत चालू असताना दोन्ही दिवस पाऊस झाला. योग्य नियोजन नसल्याने गडबड झाली नाही.

## वातावरणातील बदलामुळे आरोग्याच्या तक्रारीत वाढ !

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** दिवसा प्रचंड तापमान,-उकाडा तर रात्री गारवा वाढत असल्याने या बदलत्या वातावरणाचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. याचा सर्वाधिक त्रास अस्थमा असणाऱ्या नागरिकांना होत आहे. तसेच ताप येणे, डोकंदुखी, अशक्तपणा अशी लक्षणे असलेल्या रूग्णांची संख्याही मोठी असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. सध्या अनेक रुग्णांना व्हायरलचा त्रास होत असल्याने त्यांची रुग्णालयात गर्दी होत आहे. यामध्ये बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, बाल रुग्णालयात प्रचंड गर्दी वाढली आहे.




# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## दारव्हा तालुक्यात गणेशोत्सव शांततेत

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**दारव्हा :** शहरात गणेशोत्सवाच्या आगमन व विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी आठ डीजेवर कारवाई केल्याने विसर्जन मिरवणुकीतील उत्साहावर काहीसा परिणाम झाला. तरीही यंदाचा गणेशोत्सव शांततेत पार पडला. डीजेवर कारवाई होणार असल्याची भूमिका पोलिसांनी सुरुवातीपासूनच स्पष्ट केली होती. मात्र, ध्वनिमर्यादा पाळून साऊंड सिस्टिमला परवानगी मिळेल, अशी काही गणेश मंडळांची अपेक्षा होती. त्यानुसार तयारीही केली होती. मात्र, विसर्जनाच्या काही दिवसांपूर्वीपासूनच पोलिसांनी डीजेविरोधात कारवाई सुरू केल्याने मंडळांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. विसर्जनाच्या दिवशीही मिरवणूक मार्गावरील मंडळे वगळता काही मंडळांनी नाराजी व्यक्त करीत बराच वेळ मिरवणुकीला सुरुवात केली नाही. चर्चेअंती उशिराने मिरवणुकीला सुरुवात झाली. किरकोळ प्रकार वगळता गणेशोत्सव शांततेत पार पडला.

# महसूलमंत्री पोहोचले बांधावर; सुकलेल्या पिकांची पाहणी

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची ग्वाही; पंचनामे जलदगतीने करण्याचे बावनकुळेंचे निर्देश

#### पंचनामे अचूक, वेगाने करा

■ बाधित शेतांचे पंचनामे बिनचूक आणि जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश महसूलमंत्र्यांनी दिले. दुष्काळग्रस्त भागात सिंचनासाठी वीज व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यासही सांगितले. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

#### 'पीक पेरा'ची अडचण जागेवरच मार्गी

■ पाहणी दरम्यान डीसीएस ॲपवर नोंदविलेला पीक पेरा सॉफ्टवेअर अथवा संकेतस्थळावर दिसत नसल्याची बाब महसूलमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. बावनकुळे यांनी तातडीने अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी आयुक्त आणि जमाबंदी आयुक्त यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत तांत्रिक अडचण दूर करण्याचे निर्देश दिले.

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**यवतमाळ :** पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने पिकांची अवस्था बिकट झाली असताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून परिस्थितीची पाहणी केली. कळंब तालुक्यातील नरसापूर शिवारात सुकलेल्या पिकांची पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. 'शेतकऱ्यांना मदत कमी पडू देणार नाही,' अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

नरसापूर शिवारात फेरफटका मारताना बावनकुळे यांनी हातात सुकलेली पिके घेऊन नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांकडून पावसाचा खंड, वीजपुरवठा आणि पाण्याची उपलब्धता याबाबत माहिती घेतली. अवर्षणामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पंचनामे आणि पीक पाहणीचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केला असून, बाधित शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचविणे ही शासनाची प्राथमिकता आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले. दुष्काळी भागात सिंचनासाठी वीज तसेच पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होणार नाही, यासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी खा. संजय देशमुख, आदिवासी विकासमंत्री प्रा. अशोक उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री, जिल्हा कृषी अधिकारी मनोज ढगे यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



#### पिकांना फटका

■ यवतमाळ जिल्ह्यात यंदा सुमारे ५ लाख हेक्टरवर कापूस, २.५ लाख हेक्टरवर सोयाबीन आणि १.६ लाख हेक्टरवर तूर पिकाची पेरणी झाली आहे. पिकांच्या वाढीच्या काळातच पावसाने दडी मारल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. कृषी व महसूल विभागाकडून बाधित क्षेत्राची पाहणी करून अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

# 'डिजिटल अरेस्ट' करून ३२ लाखांचा गंडा

### चालत्या ट्रेनची चेन ओढून तीन आरोपींना ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून तब्बल ३२ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा यवतमाळ शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. बंगळुरू रेल्वे स्टेशनवरून पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या तीन आरोपींना पोलिसांनी सिनेमॅटिक स्टाईलने चालत्या ट्रेनची चेन पुलिंग करून आणि बाथरूमचे लॉक तोडून अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये थौनाओजम सुराज मेईतेई, एलांगबम बोरिश मेईतेई, खुमुकचाम रोसन सिंग सर्व रा. मणिपूर, सध्या रा. बंगळुरू (कर्नाटक) यांचा समावेश आहे. यवतमाळ येथील एका ज्येष्ठ नागरिकाला अज्ञातांनी व्हॉट्सॲप व्हिडिओ व साध्या कॉलद्वारे संपर्क साधला. आपण पोलिस अधिकारी असल्याचे सांगून, "तुमच्या बँक खात्याचा वापर मनी लॉंड्रिंगसाठी झाला असून सर्वोच्च न्यायालयाकडून तुमच्या नावे वॉरंट निघाले आहे," अशी भीती घालण्यात आली. ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२६ दरम्यान ज्येष्ठ नागरिकाला घरातच 'डिजिटल अरेस्ट' करून ३२ लाख ८० हजार रुपये विशिष्ट बँक खात्यात भरण्यास भाग पाडले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर यवतमाळ शहर पोलिसांत अप.क्र. ८४८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता आणि आयटी ॲक्टन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही धडक कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ शहर ठाण्याचे ठाणेदार पोलिस निरीक्षक निलेश सुरडकर, पो.उप.नि. निलेशकुमार मिश्रा, पोलिस



अंमलदार भरत राठोड, रविंद्र नेवारे, पवन तडसे व अंकुश फेंडर यांनी पार पाडली. पुढील तपास पो.नि. निलेश सुरडकर करत आहेत.

गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी बँक खात्याची माहिती मिळवून तांत्रिक विश्लेषण केले. तपासासाठी एक पथक बंगळुरू येथे रवाना झाले. आरोपी सातत्याने आपले लोकेशन बदलत असल्याने त्यांचा सुगावा लागत नव्हता. अखेर बंगळुरू रेल्वे स्टेशनजवळ लोकेशन मिळताच पोलिस पथकाने धाव घेतली.

त्यावेळी आरोपी 'गुवाहाटी एक्सप्रेस'ने पळून जाण्याच्या तयारीत होते. पोलिस पथकाने तात्काळ ट्रेनमध्ये चढून एकमेकांशी ताळमेळ साधत आरोपींचा शोध सुरू केला. टीटीईकडून तिकिटांची नावे तपासून पोलिसांच्या पथकाने ओळख पटवली. संशय येताच आरोपींनी पळण्याचा प्रयत्न केला व एक आरोपी थेट ट्रेनच्या बाथरूममध्ये जाऊन आतून कडी लावून लपून बसला. तीन्ही आरोपींना तात्काळ यवतमाळ येथे आणून मध्यरात्री २ वाजता न्यायाधीशांसमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींना २९ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

#### अन् बाथरूमचे कुलूप तोडले

■ तपास पथकाने तात्काळ ट्रेनची 'चेन पुलिंग' करून गाडी थांबवली. त्यानंतर दोघांना ताब्यात घेतले. तिसरा आरोपी खुमुकचाम रोसन सिंग हा बाथरूममध्ये लपून बसल्याने पोलिस अंमलदारांनी त्या ठिकाणी सतत पहारा ठेवला. ट्रेन सुमारे १०० किमी पुढे गेल्यानंतर रेल्वे मेकॅनिकच्या मदतीने बाथरूमचे लॉक तोडून तिसऱ्या आरोपीलाही ताब्यात घेण्यात आले.

# सत्यशोधक समाजाच्या विचारांची आजही गरज

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**यवतमाळ :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त यवतमाळ येथे सत्यशोधक समाज संमेलन उत्साहात पार पडले. 'सत्यशोधक समाजाची प्रासंगिकता व भविष्याची वाटचाल' या विषयावर यावेळी विचारमंथन करण्यात आले. कार्यक्रमात तीन ग्रंथांचे प्रकाशन तसेच सामाजिक व सत्यशोधक चळवळीत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष समानता, जातिनिर्मूलन, शिक्षण, सामाजिक न्याय, धर्मचिकित्सा, संसाधनांचे फेरवाटप आणि आंतरजातीय विवाह यांसारख्या परिवर्तनवादी विचारांची मांडणी केली. त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता आणि सामाजिक परिवर्तनातील भूमिका यावर संमेलनात चर्चा झाली. शिक्षण, कृषी, अर्थशास्त्र, नाटक, निबंध, आध्यात्मिक विचार



आणि आधुनिक मराठी साहित्याच्या क्षेत्रातील फुले यांच्या योगदानाचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक समाज प्रतिष्ठान, संभाजीनगरचे अध्यक्ष के. ई. हरिदास होते. सत्यशोधक चिंतक संध्याताई नरे पवार यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन केले. भारतीय पिछडा शोशित संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष वैकुंठनाथ भारती, राष्ट्रीय कार्याध्यक्ष एस. जी. माचनवार तसेच राष्ट्रीय महासचिव इंजि. आर. के. पाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

सामाजिक व सत्यशोधक चळवळीत योगदानाबद्दल सुशीलाताई मोराळे, अरविंद माळी, डॉ. अशोक चौपडे आणि सतीश जामोदकर यांना 'सत्यशोधक सन्मान' प्रदान करण्यात आला. याशिवाय सत्यशोधक समाजातील भगिनी-बंधूंचाही सत्कार करण्यात आला.

सत्यशोधक डॉ. ज्ञानेश्वर गोरे (गोबरे), अध्यक्ष, महात्मा फुले सत्यशोधक विद्यापीठ, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

सत्यशोधक अरविंद माळी, प्रा. काशीनाथ लाहोरे, डॉ. दिलीप घावडे, प्रा. अंकुश वाकडे, संजय बोरकर, प्रा. दीपक वाघ, मोहन लोखंडे, प्रा. सविता हजारे, सुनिता काळे, डॉ. विलास काळे, इंजि. दीपक श्रोते, माया गोरे (गोबरे) तसेच समस्त सत्यशोधक स्टडी सर्कलच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# शाळकरी मुलीचा विनयभंग; संतप्त गावकऱ्यांनी दिला आरोपीला चोप

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**उमरखेड :** आपल्या मैत्रिणींसोबत शाळेत जाणाऱ्या एका १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीला रस्त्यात अडवून एका तरुणाने तिची छेड काढली. ही संतापजनक घटना उमरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका गावात २४ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. या प्रकारानंतर विद्यार्थिनीने केलेल्या आरडाओरडीमुळे संतप्त गावकऱ्यांनी आरोपीला जागीच पकडून बेदम चोप दिला. त्यानंतर आरोपीला पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे तालुक्यात विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

उमरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात ११ वीत शिकणारी १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनी २४ सप्टेंबर रोजी सकाळी १०:४५ वाजताच्या सुमारास आपल्या दोन मैत्रिणींसह महाविद्यालयात जात होती. दरम्यान, रस्त्यात घर असलेला ३० वर्षीय आरोपी हातात गुलाबाचे फूल घेऊन बसला होता. विद्यार्थिनी जवळ येताच त्याने तिची ओढणी ओढून विनयभंग केला. या घटनेची तक्रार पोलिसांत केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

भररस्त्यात चाललेला हा प्रकार पाहून विद्यार्थिनींनी आरडाओरड केली. त्यानंतर स्थानिक गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत सदर विकृत तरुणाला पकडून बेदम चोप दिला. घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिसांचा ताफा तातडीने दाखल झाला व त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले.

पीडितेच्या जबाबावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करून त्याला अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे करत आहेत.

दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुलींच्या सुरक्षेबाबत पालकांमधून तीव्र चिंता व्यक्त केली जात असून अशा रोडरोमिओंचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

# स्फोटाच्या घटनेत चौघांचा मृत्यू; मृतासह दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**उमरखेड :** शहरात ढाणकी रोडवरील जाकीर हुसेन वॉर्ड परिसरात शनिवारी (दि. २६) सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास एका वेल्डिंग वर्कशॉपमध्ये थरकाप उडवणारी घटना घडली. ब्लास्टिंगच्या ट्रॅक्टरवर वेल्डिंगचे काम सुरू असताना अचानक भीषण स्फोट होऊन चार जणांचा जागीच व उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दहा जण गंभीर जखमी झाले. स्फोटाची तीव्रता एवढी प्रचंड होती की, परिसरात आठ ते नऊ तास भीतीचे वातावरण पसरले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ढाणकी रोडवरील 'किसान वेल्डिंग वर्कशॉप' येथे एमएच २९ व्ही २५२८ क्रमांकाचा ब्लास्टिंग ट्रॅक्टर वेल्डिंगसाठी उभा होता. वेल्डिंगचे काम सुरू असताना



ट्रॅक्टरमध्ये ठेवलेल्या स्फोटकांचा अचानक जोरदार स्फोट झाला. या स्फोटात ट्रॅक्टरचा चक्काचूर होऊन तो जळून खाक झाला. तसेच जवळच उभ्या असलेल्या मारुती ईको आणि बोलेरो मॅक्स पिकअप या वाहनांचेही मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ धाव घेतली. घटनास्थळी 'Super Power 90' नावाच्या ४० ते ५० स्फोटकांच्या अर्धवट फुटलेल्या ट्यूब आणि कॉर्डेक्स वायरचे बंडल आढळून आले.

ट्रॅक्टर मालक व चालकाकडे स्फोटके बाळगण्याचा किंवा वापरण्याचा परवाना नसतानाही, त्यांनी ट्रॅक्टरमध्ये निष्काळजीपणे स्फोटके ठेवली होती. याप्रकरणी पोलिसांनी फिर्यादीवरून ट्रॅक्टर मालक अप्पाराव माधवराव बोक्से (वय ५५, रा. बाळदी), चालक (मृतक) वैभव अप्पाराव बोक्से (वय २०, रा. बाळदी) आणि स्फोटकांचा पुरवठा करणारा बळीराम नरवाडे (वय ५०, रा. ढाणकी) यांच्याविरुद्ध स्फोटक पदार्थ अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातात गंभीर जखमी झालेल्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील या गुन्ह्याचा पुढील तपास करत असून स्फोटकांचा मूळ स्रोत, त्यांची बेकायदेशीर वाहतूक व साठवणूक याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

#### ८ ते ९ तास बैल बाजार परिसर बंद

■ दुर्घटनेनंतर सुरक्षेचा उपाय म्हणून उमरखेड-ढाणकी राज्यमार्गावरील बैल बाजार परिसर पोलिसांनी तब्बल आठ ते नऊ तास पूर्णपणे बंद ठेवला होता. सकाळी ११:३० पासून ते रात्री १० वाजेपर्यंत संपूर्ण परिसरात पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील यांनी नागपूर एटीएस, अमरावती फॉरेन्सिक पथक, डॉग पथक आणि वर्धा येथील विस्फोटक पथकाला पाचरण केले होते.

# आंतरराज्यीय जनावरांची तस्करी; ६४ जनावरांची सुटका

### ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त; उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील ४ आरोपींना पोलीस कोठडी

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**यवतमाळ :** मध्य प्रदेशातून तेलंगणा व आंध्र प्रदेशाकडे कत्तलीच्या उद्देशाने वाहनात कोंबून नेल्या जाणाऱ्या ६४ जनावरांची अवधूतवाडी पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने कारवाई करत सुटका केली आहे. अत्यंत क्रूर, अमानुषपणे लोखंडी पार्टिशन करून वाहनात दोन स्तरांत दाटीवाटीने बांधून नेण्यात येत असलेल्या या जनावरांपैकी ३ जनावरे मृत अवस्थेत आढळली. पोलिसांनी या कारवाईत जनावरे, कंटेनर, मोबाईल असा एकूण ४३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ४ आरोपींना अटक केली आहे.

#### ४३ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

■ जनावरांची किंमत : १२,८०,०००/-, कंटेनर वाहनाची किंमत ३०,००,०००/-, मोबाईल फोन ३ नग: ३०,०००/- एकूण जप्त मुद्देमाल: ४३,१०,०००/- (त्रेचाळीस लाख दहा हजार रुपये).

अवधूतवाडी पोलिसांच्या डी.बी. पथकाला मिळालेल्या माहितीनुसार, आंतरराज्यीय जनावर तस्करांकडून एका कंटेनर वाहनामध्ये लोखंडी पार्टिशन करून खाली व वर अशा दोन मजल्यांत जनावरांना अत्यंत दाटीवाटीने व क्रूरपणे कोंबून नेले जात होते. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून या वाहनाची तपासणी केली असता, ६४ जनावरे कत्तलीच्या उद्देशाने आंतरराज्यीय मार्गाने वाहतूक करताना आढळली. यातील ६१ जनावरांची कत्तलीपासून सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी मोहम्मद अली (वय २४, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश), एकराम मोहम्मद अजगर (वय ३४, रा. भोपाळ, मध्य प्रदेश), वाजिद अली साबीर अली (वय ३१, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश) आणि मोहम्मद असलम मोहम्मद अजगर (वय ३५, रा. भोपाळ, मध्य प्रदेश) यांना ताब्यात घेतले. आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करून न्यायालयासमक्ष हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना २ दिवसांची पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजित कदम यांच्या आदेशान्वये सपोनि रवींद्र बारड, सपोनि श्रीकांत जिंदमवार, पोलीस अंमलदार सुरेश मेश्राम, विशाल भगत, ऋतुराज मेडवे, रुपेश ढोबळे, मोहम्मद भगतवाले, कमलेश भोयर, सचिन राठोड, योगेश चोपडे व राज कांबळे यांनी केली आहे.

#### स्थानिक कनेक्शनचाही शोध

■ या आंतरराज्यीय तस्करीत सहभागी असलेल्या तसेच स्थानिक पातळीवर वाहनांची व्यवस्था, आश्रय, मार्गदर्शन किंवा अन्य कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या व्यक्तींची माहिती संकलित करण्यात येत आहे. तपासात सहभाग निष्पन्न झाल्यास त्यांच्यावरही कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# आर्णीतील सर्व इमाम हजला जाणार

### बाबा कम्बलपोष उर्दू हायस्कूलमध्ये हाजींचा गौरव; भाई अमन यांची घोषणा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**आर्णी :** येथील बाबा कम्बलपोष उर्दू हायस्कूलमध्ये रविवारी (दि. २७) आयोजित विशेष सोहळ्यात हज यात्रेवरून परतलेल्या हाजींचा शाल व पुष्पगुच्छ देऊन भावूक वातावरणात गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात उद्योजक अल्हाज भाई अमन यांनी आर्णीतील सर्व मशिदींच्या इमामांना २०२८ मध्ये स्वतःच्या खर्चाने हज यात्रेला पाठवण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली.

'इस्तकबाल व एजाज' या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सैयद मकसूद अली पटेल होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अल्हाज भाई अमन, अल्हाज उमेदजी फानन व अल्हाज मोहसिन दइय्या उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात साकिबुन्नबी याच्या कुरआन पठणाने, तर कु. फिरदौस परवीन हिच्या नात-ए-पाक सादरीकरणाने झाली.

आपल्या मनोगतात भाई अमन म्हणाले, "अल्लाहची कृपा आणि आई-वडिलांच्या सेवेचे पुण्य लाभल्याशिवाय हजचा योग येत नाही." आयोजकांच्या विनंतीला मान



देऊन त्यांनी २०२८ मध्ये तालुक्यातील सर्व इमामांचा हजचा खर्च उचलण्याचे जाहीर केले. तर, "हज करणे सोपे असले तरी हजानंतर आचरणात सकारात्मक बदल घडवून खरा हाजी बनणे कठीण आहे," असे मत मोहसिन दइय्या यांनी व्यक्त केले.

यावेळी एन. आय. खान यांनीही विचार मांडले. प्रास्ताविक सैयद मुजफ्फर हुसेन यांनी, तर सूत्रसंचालन व आभार मुजीब शेख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका फिरदौस शाहीन यांच्यासह शाळांच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांना मदतीची आश्वासन, आमदार राणांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेला शब्दा पाळला असून दिवाळीच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीचे पैसे जमा होऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड होईल, असा विश्वास व्यक्त करत आमदार रवी राणा यांनी त्यांचे आभार मानले.



अमरावती जिल्ह्यामध्ये गेल्या दीड महिन्यापासून प्रदीर्घ पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिवाळाळ्यापूर्वीच हिरावला गेला आहे. सोयाबीन आणि कापूस पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवी राणा आणि अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी दौरा केला.पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली

आमदार रवी राणा आणि आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर तालुक्यातील भोरगाव, आशेगाव, निजामपूर, कुभापूर, मेळघाट, मोर्शी आणि वरुड परिसरातील अनेक गावांना प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी शेतात उतरून नष्ट झालेली सोयाबीन आणि कापूस पिकांची पाहणी केली आणि पिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी मुंबईत विमानतळावर मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन अमरावती जिल्ह्याला तात्काळ 'दुष्काळग्रस्त' जाहीर करण्याची मागणी करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत संपूर्ण जिल्ह्याला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**दिवाळीपूर्वी मदतीची अपेक्षा**

शेतकऱ्यांची दिवाळी गोड जावी यासाठी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळीच्या आधीच मदतीचे पैसे जमा झाले पाहिजेत, यासाठी सरकारकडे तीव्र पाठपुरावा सुरू आहे. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ दिली जाणार नाही, असा विश्वास आमदारांनी यावेळी दिला.

या पाहणी दौऱ्यात आमदार रवी राणा, आमदार प्रवीण तायडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शेतकरी आणि महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळेस प्रकाश साबळे, सोनाली नवले, रविंद्र गवई, अनुराग बोरकर, वैभव गोसावी, अक्षय लोंधे, ओमकार मोहोळ, शिवनारायण पंडित, अजिंक्य काळे, चेतन चिखलकर, रवी शहारे, संतोष ठाकूर, राहुल वानखडे, ऊपेन बचेल, तमीज शाहा, अमोल लोंधे, सचिन शेनवारे,मिकिन्दा कडू, आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद अमरावती येथे पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात आज अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्रीराम कुलकर्णी यांच्या हस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले. त्यानंतर कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या मनोगतात त्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचे विवेचन केले. तसेच त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनातील योगदान आणि विचारांविषयी उपस्थितांना माहिती दिली.

या कार्यक्रमास प्रशासन अधिकारी श्री. संजय मुंद्रे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री. पंकज गुल्हाने, श्री. विजय कविटकर व श्री. विजय कोठाले, स्वीय सहाय्यक श्री. परमेश्वर राठोड, वरिष्ठ सहाय्यक श्री. विलास मेदूकर, कनिष्ठ सहाय्यक श्री. विशाल कुळसंगे, सांख्यिकी सहाय्यक श्री. प्रयोग भोंडे, वरिष्ठ सहाय्यक श्री. राहुल काळमेघ, परिचर श्री. युसुफ शहा यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्री. विजय कविटकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्य व विचारांचे स्मरण करीत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राणा यांच्या निवासस्थानातील गणरायाचे कृत्रिम तलावामध्ये केले विसर्जन

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती:** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात आ. रवि राणा व भाजपा नेत्या, मा. खासदार नवनित राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानातील श्री गणरायाचे शनिवारी छत्री तलाव येथील कृत्रिम तलावात भावुक वातावरणात विसर्जन करण्यात आले. यावेळी राणा परिवारातील सदस्यांसह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने गणरायाची आरती करून, श्रींचे दर्शन घेत भावपूर्ण वातावरणात बाप्पाला निरोप देण्यात आला.



गणरायाचे विसर्जन करताना आ. रवि राणा व नवनित राणा भावुक झाले. यावेळी बोलताना भाजपा नेत्या नवनित राणा म्हणाल्या की, "गणपती बाप्पाला एक परिवारातील व्यक्ती म्हणून आपण आपल्या घरी आणतो. त्यामुळे बाप्पाला निरोप देताना डोळे भरून येतात. मात्र बाप्पा पुढील वर्षी पुन्हा मोठ्या उत्साहात आपल्या घरी यावा, अशी प्रत्येकाचीच भावना असते."

यावेळी त्यांनी राज्यातील शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या घरात सुख, समृद्धी आणि समाधान नांदावे, अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना केली. सध्या शेतकरी विविध संकटांना सामोरा जात असून, पावसाच्या अनिश्चिततेमुळे अनेक भागांमध्ये शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी अंधारात जाऊ नये आणि त्यांच्या खात्यात योग्य ती नुकसानभरपाईची मदत पोहोचावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना गणपती बाप्पाने शक्ती द्यावी, अशी प्रार्थना केल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर आम्हाला ठाम विश्वास आहे. राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या अडचणी दूर करण्यासाठी शासन निश्चितपणे आवश्यक ती पावले उचलेल," असा विश्वास नवनित राणा यांनी व्यक्त केला.

दरम्यान, आ. रवि राणा यांनीही गणरायाच्या विसर्जनावेळी शेतकरी राजा सध्या मोठ्या संकटात असल्याचे सांगितले. पावसाच्या कमतरतेमुळे राज्यातील काही भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात सरसकट नुकसानभरपाईची रक्कम जमा व्हावी, तसेच संपूर्ण महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडून शेतकरी राजा सुखी व समृद्ध व्हावा, अशी प्रार्थना त्यांनी गणरायाच्या चरणी केली.आ. रवि राणा म्हणाले की, "शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आज शेतकरी संकटात असताना त्याच्या पाठीशी उभे राहणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. गणपती बाप्पाने राज्यातील शेतकऱ्यांवरील संकट दूर करावे, त्यांच्या शेतात भरघोस पीक यावे आणि त्यांच्या घरात सुख-समृद्धी नांदावी, अशी मनापासून प्रार्थना केली आहे.

छत्री तलाव येथील कृत्रिम तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करताना परिसरात भक्तिमय व भावनिक वातावरण निर्माण झाले होते. "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या" या जयघोषात राणा परिवाराने बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. यावेळी उपस्थितांनीही गणरायाचे मनोभावे दर्शन घेत महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

# दर्यापुरात जीवन प्राधिकरणची पाईपलाईन फुटली

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती :** आठवडी बाजार बगीचा जवळ जीवन प्राधिकरण ची मोठी पाण्याची पाइपलाइन तीन चार दिवसा पासून फुटली आहे.

तिथे खड्डा झाला त्यात पाणी साचते. या पाण्यात डुकरे बसतात. . नळ बंद होतांना हे दूषित पाणी परत पाईप लाईन मध्ये ओढल्या जाते .

हे दूषित पाणी पाईप लाईन मधून घरा घरात पोचत आहे. तक्रार दिली जीवन प्राधिकरण ने दुरुस्ती केली . पण व्यवस्थित केली नसल्या मुळे मोठी भेग होऊन जास्त पाणी बाहेर येत आहे.

दूषित पाणी पिऊन मोठी



समस्या निर्माण होऊ शकते.

यंदा पाऊस कमी झाल्याने पाण्याची टंचाई आहे. मात्र जीवन प्राधिकरणाच्या पाईपलाईन मधून पाण्याचा अपव्यय होत आहे. त्यामुळे सदर पाईपलाईन दुरुस्त करावी अशी मागणी होत आहे.

# महा. अंनिसची अमरावती जिल्हा बैठक संपन्न

## चमत्कार प्रशिक्षणावर भर; चिखलदरा-धारणी येथे शाखा बांधणी दौरा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती:** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महा. अंनिस) अमरावती जिल्हा शाखेची जिल्हा बैठक गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट, राधानगर येथे उत्साहपूर्ण व विचारमंथनात्मक वातावरणात संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद कोळमकर होते. मार्गदर्शक म्हणून नरेंद्र धर्माळे व लक्ष्मण तडस उपस्थित होते.



अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य अधिक प्रभावीपणे गावागावात पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांना चमत्कार प्रशिक्षण देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तथाकथित चमत्कारांमागील वैज्ञानिक कारणे, हातचलाखीचे प्रकार आणि फसवणुकीच्या पद्धती समजून घेऊन ते सर्वसामान्य नागरिकांसमोर वैज्ञानिक पद्धतीने मांडण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यात संघटना बांधणीला अधिक गती देण्याबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विशेषतः चिखलदरा व धारणी येथे लवकरच शाखा बांधणी दौरा आयोजित करून मेळघाट परिसरात अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचारांचा प्रसार वाढविण्याचे निश्चित करण्यात आले.बैठकीत नुकत्याच अंबाजोगाई येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीचा अहवाल मांडण्यात आला. जिल्हा तसेच विविध शाखांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे यांनी जिल्हा अहवाल सादर केला.

प्रफुल्ल मंदा श्रीधर यांनी अंनिसच्या अंकाचे वर्गणीदार वाढविणे, अंकाचा व्यापक प्रसार आणि संघटना बांधणी याबाबत मार्गदर्शन केले. वैज्ञानिक व विवेकवादी विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अंनिसच्या अंकाचे नियमित वर्गणीदार वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

बडनेरा शाखेचा अहवाल बबिता वानखडे, दर्यापूरचा नरेंद्र धर्माळे, चांदूर रेल्वेचा पल्लवी ढोले, अमरावती शहर शाखेचा सचिन खोब्रागडे, चांदूर बाजार शाखेचा राहुल खंडारे, तर पुजदा शाखेचा अहवाल प्रतिभा खापरे यांनी सादर केला.

# कंपन्यांच्या वादात सफाई कामगार आणि नागरिक भरडले जाऊ नयेत!

## कामगारांचे हक्क, नागरिकांची स्वच्छता आणि मनपाची जबाबदारी हेच तीन खरे प्रश्न!

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती:** शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा प्रश्न सध्या पुन्हा चर्चेत आला आहे. महानगरपालिका आणि कोणार्क कंपनी यांच्यातील करारासंदर्भात न्यायालयीन वाद निर्माण झाला असून, करारातील नियम, अटी आणि कागदपत्रांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणाचा अंतिम निर्णय संबंधित न्यायालयीन प्रक्रियेत होईल. मात्र या कायदेशीर वादाच्या पलीकडे एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे—या सगळ्यात सफाई कामगारांचे काय आणि अमरावतीच्या नागरिकांचे काय?

आज विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते या प्रश्नावर आंदोलने, मोर्चे आणि निवेदने देत आहेत. ही लोकशाहीतील आवश्यक प्रक्रिया आहे. पण या संघर्षाचा केंद्रबिंदू कंपनी किंवा ठेकेदाराच्या अस्तित्वाऐवजी सफाई कामगार आणि नागरिकांचे हित असले पाहिजे. या प्रश्नाकडे तीन मूलभूत मुद्द्यांतून पाहण्याची गरज आहे.

सफाई कामगारांचे रोजगार, आरोग्य आणि सामाजिक हक्क

अमरावती शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दररोज प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून काम करणारा सफाई कामगार या संपूर्ण व्यवस्थेचा कणा आहे. मात्र कंत्राटी वाद निर्माण झाला की सर्वप्रथम असुरक्षित होतो तो हाच कामगार.

त्याला किमान वेतन मिळते का? त्याच्या वेतनातून PF आणि ESICची कपात होत असेल तर ती नियमितपणे जमा होते का? त्या खात्यांची माहिती त्याला उपलब्ध आहे का? त्याची नियमित आरोग्य तपासणी होते का? कामाच्या स्वरूपाला आवश्यक सुरक्षा साधने, प्रशिक्षण आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळते का?

हे प्रश्न आता केवळ विचारण्यापुरते न राहता प्रत्यक्ष तपासण्याची वेळ आली आहे.

सफाई कामगार हा कंत्राटदाराच्या हजेरीपत्रकावरील केवळ एक क्रमांक नाही. तो कामगार आहे, नागरिक आहे आणि आपल्या कुटुंबाचा आधार आहे. कंपनी किंवा कंत्राटाबाबतचा वाद सुरू असताना त्याच्या रोजगारावर परिणाम होऊन घरातील चूल बंद पडत असेल, तर ही गंभीर सामाजिक बाब आहे.

कंत्राटाचा वाद दोन संस्थांमध्ये असू शकतो; त्याची किंमत कामगाराच्या पोटातून वसूल होता कामा नये., अमरावतीच्या नागरिकांच्या स्वच्छतेचा अधिकार

दुसरा प्रश्न आहे तो अमरावतीच्या नागरिकांचा.

नागरिकांना कोणत्या कंपनीला कंत्राट मिळाले, कोणता ठेकेदार राहिला किंवा कंत्राटाबाबत न्यायालयीन निर्णय काय झाला, यापेक्षा त्यांच्या परिसरातील कचरा वेळेवर उचलला जातो का, रस्ते स्वच्छ आहेत का आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित आहे का, याची चिंता आहे.

# शेतातील कंपाउंडमधील जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## ५ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणची कार्यवाही

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अमरावती:** अमरा शेतातील कंपाउंडमधील जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश, करून ५ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणची कार्यवाही झाली.

आरोपी नाव अब्दुल आवेज अब्दुल अनिस वय २५ वर्ष रा. धोतरखेडा ता. अचलपुर ह.मु. यास्मिन नगर अमरावती, अब्दुल शाकीर अब्दुल साबीर वय ३४ वर्ष रा. पिपलपुरा मोर्शी, शेख नईम शेख रहिम वय ४० वर्ष रा. सुलतानपुरा मोर्शी ,जमीर खान साबीर खान वय ३४ वर्ष रा. सुलतानपुरा मोशी अर्जुन बलदेव पठारिया वय २५ वर्ष रा. देशवाडी जि. वैतुल मध्यप्रदेश असे आहे.

दि.११/०५/२०२६ रोजी पोलिस स्टेशन मोर्शी येथे फिर्यादी नामे गजानन महादेव सोनुले रा.पेठपुरा मोशी यांनी रिपोर्ट दिला की, मौजा पाळा शेतशिवार येथील त्यांच्या शेतातील कुंपणात बांधलेल्या १२ म्हशी पैकी ०७ म्हशी व ०१ हेला अशी ०८ जनावरे कि ०१,२०,०००/- रू चे कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले., अशा फि चे रिपोर्ट वरून पोस्टे मोर्शी येथे अप क्र २८७/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रा. यांच्याकडुन करण्यात येत असताना आज दि.२७/०९/२०२६ रोजी गोपनिय माहिती, तांत्रिक तपास व उपलब्ध माहितीच्या आधारे माहिती मिळाली की, सदर चोरी हो अब्दुल आवेज अब्दुल अनिस रा. यास्मिन नगर अमरावती याने त्याचे साथीदारासह केली आहे. वरून आम्ही पोस्टाफसह नमुद ईसमास अमरावती येथुन ताब्यात घेतले असता त्याने आधी उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु त्यास आणखी विश्वासात घेवुन पुन्हा विचारपुस केली असता त्याने त्याचे साथीदारांसह सदर गुन्हा. केल्याची कबुली दिली. वरून आम्ही त्याचे साथीदारांना (आरोपींना) मोशी तसेच रानीपुर जि. बेतुल मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी आधी उडवाउडवीची उत्तरे दिली त्यांना आणखी सखोल विचारपुस केली असता त्यांनीसुध्दा सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. वरून आम्ही नमुद आरोपी यांना गुन्हयात चोरी गेलेल्या म्हशी कोणास विकल्या याबाबत विचारपुस केली असता त्यांनी सागीतले की, सदर मुददेमाल त्यांनी आरोपी नामे अर्जुन बलदेव पठारिया रा देशवाडी शाहापुर ह.मू. राणीपुर जि. बैतुल याच्या मार्फतीने ग्राम भानपुर जि. भोपाल मध्यप्रदेश येथील बैल बाजारात विनापावतीने विक्री केल्याचे सांगीतले.

# आमदार साहेब.... नेहमी चांदूर रेल्वेवरच अन्याय का?

## नागरिकांचा आ. प्रताप अडसड यांना सवाल; आधी प्रतिनिधित्व घटले, आता प्रशासकीय सुविधांवरही प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**चांदूर रेल्वे :** एकेकाळी मतदारसंघाचे नाव चांदूर रेल्वे... आता धामणगाव रेल्वे! जि.प. व पं.स. सर्कलचे राजकीय प्रतिनिधित्वात घट झाल्यानंतर आता प्रशासकीय सुविधाही दुसरीकडे वळवल्या जात आहेत का ? असा थेट सवाल चांदूर रेल्वे तालुक्यातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे हे तीन तालुके येतात. या तिन्ही तालुक्यांसाठी चांदूर रेल्वे येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय कार्यरत आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या दृष्टीने चांदूर रेल्वे हे उपविभागाचे प्रमुख केंद्र राहिले आहे. मात्र आता दर गुरुवारी धामणगाव रेल्वे येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे कामकाज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने चांदूर रेल्वेतील



नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. याच पार्श्वभूमीवर "चांदूर रेल्वेवर वारंवारच अन्याय का?" असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. चांदूर रेल्वेतील विद्यमान प्रशासकीय सुविधांचे महत्त्व कमी होत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

**वीस वर्षांपूर्वी मतदारसंघाचे नाव बदलले; परिणाम मात्र चांदूर रेल्वेवर?**

सुमारे वीस वर्षांपूर्वी चांदूर रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे नाव बदलून धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघ करण्यात आले. त्यानंतर मतदारसंघाची राजकीय ओळखच बदलली. या बदलामुळे चांदूर रेल्वेच्या राजकीय आणि प्रशासकीय महत्त्वावर नेमका काय परिणाम झाला, याचा आज पुन्हा आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

**जिल्हा परिषद, पंचायत समितीतही प्रतिनिधित्व घटले!**

याच मालिकेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सुमारे वर्षभरापूर्वी झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कलच्या पुनर्रचनेत चांदूर रेल्वे तालुक्यातील एक जिल्हा परिषद सर्कल कमी करण्यात आले, तर पंचायत समितीची दोन सर्कल कमी झाली. विशेष म्हणजे, या प्रतिनिधित्वातील घट होत असतांना आमदार प्रताप अडसड यांनी चांदूर रेल्वे तालुक्याच्या बाजूने ठोस आवाज उठवला नाही, असा आरोप तालुक्यातील काही नागरिकांकडून केला जात आहे. नागरिकांचा सवाल असा आहे की, चांदूर रेल्वे तालुक्याचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होत असताना त्यावेळी लोकप्रतिनिधींनी याबाबत शासनाकडे ठाम भूमिका मांडली का? या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी प्रयत्न झाले का?

**आधी सर्कल कमी, आता कार्यालयीन कामकाजही विभागले!**

एकीकडे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या पुनर्रचनेत चांदूर रेल्वे तालुक्याचे प्रतिनिधित्व कमी झाले, तर दुसरीकडे आता चांदूर रेल्वे येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील आठवड्यातील एक दिवस गुरुवार धामणगाव रेल्वे येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आधी राजकीय प्रतिनिधित्व कमी झाले... आता प्रशासकीय कामकाजाचे विकेंद्रीकरण चांदूर रेल्वेपासून दूर का? ही सर्व घडामोडी केवळ योगायोग आहेत की, चांदूर रेल्वेचे राजकीय व प्रशासकीय महत्त्व हळूहळू कमी होत आहे? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

"आज एक दिवस, उद्या पूर्ण कार्यालय?" - ॲड. अहेफाज रराणी

चांदूर रेल्वे येथे आधीपासून उपविभागीय अधिकारी कार्यालय कार्यरत असतांना त्याच कार्यालयाचे नियमित कामकाज आठवड्यातील एक दिवस धामणगाव रेल्वेत सुरू करण्याची आवश्यकता का निर्माण झाली, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. धामणगाव रेल्वेतील नागरिकांना सुविधा मिळणे ही सकारात्मक बाब असली, तरी त्यासाठी चांदूर रेल्वेतील विद्यमान प्रशासकीय सुविधांचे महत्त्व कमी होता कामा नये. कारण आज गुरुवारी कामकाज उपलब्ध झाले आहे; उद्या हळूहळू संपूर्ण कार्यालयच धामणगाव रेल्वेला हलविण्याची वेळ आली तर? असा प्रश्नही नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे असे मत मत चांदुर रेल्वे शहरातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. अहेफाज रराणी यांनी व्यक्त केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अखेर वाशीम जिल्हा दुष्काळग्रस्त...

**केनवड :** यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या दीर्घ खंडामुळे सोयाबीन, तूर, कापूस, उडीद, मूग, ज्वारी-बाजरीसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले. राज्य शासनाने २६५ तालुक्यांचा दुष्काळी उपाययोजनांमध्ये समावेश केला असून, वाशिम जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव आणि वाशिम या उर्वरित तीन तालुक्यांचाही समावेश झाल्याने संपूर्ण जिल्हा दुष्काळाच्या कक्षेत आला आहे. शेतकऱ्यांच्या मागणीसाठी विविध लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला. तसेच शिवसंग्रामच्या निवेदनाची व बातमीची कृषिमंत्री तथा पालकमंत्री दत्तामामा भरणे यांनी दखल घेतल्याचा दावा संघटनेने केला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजार रुपयांची मदत तसेच रब्बी हंगामासाठी बियाणे, खते व औषधांची मदत द्यावी, अशी मागणी शिवसंग्रामने केली आहे. या निर्णयाबद्दल शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील बाजड यांच्यासह पदाधिकारी व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.



# भ्रष्टाचार हमेशा, टक्केवारीचा 'श्रीगणेशा'!

***सरपंच म्हणतो, 'द्या दाम, नाहीतर बंद करा काम' * ४० हजार रुपयांची कथित मागणी; तर इतर कामांतून किती असतील 'गिळले'**

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

गावाच्या विकासाची जबाबदारी असलेल्या सरपंचाकडूनच विकासकामाच्या बदल्यात पैशांची कथित मागणी होत असल्याचा ऑडिओ क्लिप समोर आल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'दाम द्या, नाहीतर बंद करा काम...' अशा आशयाच्या कथित संभाषणाची ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती आली असून, एका विकासकामासाठी तब्बल ४० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे आता केवळ एका कामाचा नव्हे, तर यापूर्वीच्या इतर विकासकामांतून किती रक्कम या सरपंचांनी व साथीदारांनी गिळली असेल ? असा थेट सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.







गावातील विकासकामे ही नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी असतात. शासनाचा निधी मंजूर होतो, कामे सुरू होतात; मात्र त्याच कामातून पैशांची मागणी होत असल्याचा आरोप समोर येत असेल, तर विकासाचा पैसा कामासाठी की टक्केवारीसाठी? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. संबंधित विकासकामाच्या संदर्भात ४० हजार रुपयांची मागणी केल्याचा दावा करण्यात येत आहे. तसेच कामाच्या रकमेतील पाच टक्के हिस्सा सरपंच म्हणतो मला परवडत नाही मला जास्त पाहीजेत या ऑडिओ क्लिप मध्ये मागितल्यासंदर्भातील कथित संभाषण या क्लिप मध्ये आहे. त्यामुळे टक्केवारीचा श्रीगणेशा विकासकामातूनच होत असेल, तर गावाच्या विकासाचा शेवट कुठे होणार? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. रस्ते, नाली, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र, विकासकामे करताना पैशांच्या मागणीचे आरोप होत असतील, तर आतापर्यंत झालेल्या सर्व विकासकामांची चौकशी करून प्रत्येक कामाचा हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, घरकुलाच्या लाभासाठीही लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असल्याची चर्चा आहे. तर यासाठी गावातीलचं कंत्राटी दलाला ठेवला आहे. गरजू कुटुंबांसाठी असलेल्या घरकुल योजनेतही पैशांची मागणी झाल्याचा आरोप गंभीर असून, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. ४० हजारांची कथित मागणी, पाच टक्के टक्केवारीचा आरोप आणि घरकुलातील २० हजारांची चर्चाऱ्या सर्व प्रकरणांची प्रशासन चौकशी करणार का? आणि आतापर्यंतच्या विकासकामांचा हिशोब जनतेसमोर येणार का? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### लाच मागणी व कथित भ्रष्टाचाराविरोधात गावकरी एसीबीकडे करणार तक्रार

विकासकामातून ४० हजार रुपयांची कथित लाच मागितल्याच्या आरोपासह गावातील विविध विकासकामांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींनी वातावरण तापले आहे. पैशांच्या मागणीची कथित ऑडिओ क्लिप समोर आल्यानंतर आता ग्रामस्थांनी या प्रकरणाला थेट भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) दारात नेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

### लाच मागणीचा आरोप, भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा पाढा; आता एसीबीच्या चौकशीकडे गावकऱ्यांच्या नजरा

गावातील विकासकामे, निधीचा वापर आणि पैशांच्या कथित मागणीची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## थोडक्यात

### दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत वाशिम जिल्ह्यातील सहाही तालुके समाविष्ट

***शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजनांचा दिलासा**
***पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पाठपुराव्याला यश**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

खरीप हंगामातील पर्जन्यमानातील तूट, पिकांची प्रतिकूल स्थिती आणि उपलब्ध पाणी परिस्थितीचा विचार करून वाशिम जिल्ह्यातील तालुक्यांचा दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत (ट्रीगर-१) समावेश करण्यात आला आहे. याबाबत राज्य शासनाने आज शासन निर्णय निर्गमित केला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुष्काळसदृश परिस्थितीतील विविध उपाययोजना व सवलतींचा लाभ मिळावा, यासाठी राज्याचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यामुळे यश आले आहे. खरीप २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट, पिकांची स्थिती आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून कृषी आयुक्तांच्या अहवालाच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती आढळून आली आहे. त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. पालकमंत्री श्री भरणे यांनी स्वतः वाशिम जिल्ह्यात पाहणी करून सविस्तर आढावा घेतला व मदतीच्या अनुषंगाने पाठपुरावा केला.



**शेतकरी व नागरिकांना विविध सवलती**

दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर झालेल्या भागात नागरिक व शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन निर्णयानुसार विविध उपाययोजना लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसूल वसुलीस सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती तसेच कृषी पंपाच्या वीजबिलात सवलत यांचा समावेश आहे. तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांच्या निकषांमध्ये शिथिलता, आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याचे टँकर, शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करणे, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व मजुरांसाठी अन्नधान्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा व्यवस्था आणि जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहेत. पिण्याचे तसेच जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याच्या उपाययोजनाही करण्यात येणार आहेत.

## कुकसा धरणाच्या भिंतीवरील...
# सोलार प्लान्ट नाही काढला, अधिकाऱ्यांचा हप्ता वाढला!

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

धरणाच्या भिंतीवर वर्षानुवर्षे सम्रुध्दी महामार्ग झाडांसाठी पाणी उपसा सिंचन करण्यासाठी लघुपाटबंधारे विभागाने महीनाकाठी हत्पा ठरुन सोलार प्लान्ट चक्क धरणारच्या भिंतीवरच बसवु दिला. याबाबत विरोध आल्याने लघुपाटबंधारे विभागाने महीनाकाठी हत्पा वाढवला, परंतु भिंतीवरील प्लांन्ट नाही काढला. सोलार प्लान्टचा ठिय्या कायम, विरोध झाला तरी कारवाई नाही आणि आता अगोदर मिळणारा महीण्या काठी वाढुन घेतला आहे.

विभागाचे पैस्याकडेलक्ष, मात्र गावकऱ्यांच्या सुरक्षेतेचा व धरणाच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मात्र धोका असताना सोलार प्लान्ट हटविण्याऐवजी लघुपाटबंधारे विभागाने हत्पा वाढुन कुठलीच कार्यवाही या विभागाच्या केलि नाही. मात्र या विभागाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विरोध झाला म्हणून कारवाई होईल, अशी अपेक्षा असताना यांचाच फायदा झाला आहे, असा संतप्त सवाल आता स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. धरणाच्या भिंतीवर वर्षानुवर्षे लावून ठेवण्यात आलेला हा सोलार प्लान्ट नेमका कोणत्या परवानगीच्या आधारे बसविण्यात आला, त्याला परवानगी कोणी दिली आणि भिंतीला धोका असुनही हटविण्यात का आला नाही, याची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. विशेष म्हणजे, सोलार प्लान्ट हटविण्याला विरोध होत असताना संबंधित विभागाने ठोस कारवाई करण्याऐवजी हत्पा वाढवून आपलाचं फायदा घेतला आहे. धरणाची भिंत ही जलसाठा आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असताना त्यावर वर्षानुवर्षे सोलार प्लान्ट ठेवण्याबाबत नियमांची पूर्तता झाली आहे का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. धरणाच्या भिंतीपेक्षा सोलार प्लान्टला प्राधान्य का? असा सवालही आता उपस्थित होत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून सोलार प्लान्ट बसविण्याची परवानगी, मागील अधीकारी कोण परवानगी दिली कोणी संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करावीत. तसेच धरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अनधिकृतपणे लावलेला सोलार प्लान्ट तातडीने हटवावा, व अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.









# वाशीम-रिसोड रोड वर वाटमारीच्या घटनेत वाढ!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**गेल्या काही दिवसांपासून रिसोड वाशिम रोड वर वाटमारीच्या घटनांत वाढ झाली असून घटनेत चोरटे देशी कट्टा व चॅपर चा वापर करीत धाक दाखवून वातसुरुला लुटण्याचे काम करीत आहेत, पोलिस दलाच्या कर्तव्य हितेमुळ ग्रामस्थांचा पोलिसावर विश्वास राहिला नसल्याने ग्रामस्थ तक्रार करण्यात पुढे येत नाहीत.**

## पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

मागील काही दिवसांपासून वाशिम रिसोड रोडवर त्यातही विशेषतः मोहजा सावरगाव शिवारात या लूटमारीच्या घटना वाढल्या आहेत.

रात्रीच्या सुमारास लिफ्ट घेण्याच्या बहाण्याने हे चोरटे एकट्या दुकट्या दुचाकी, चारचाकी वाहनात जबरदस्ती घुसतात, वाहनचालकाच्या डोक्याला बंदूक, किंवा चाकू लाऊन धमकावत सावरगाव मोहजा शिवारातील जंगलात नेतात, तेथे त्याला तुला मारण्याची आम्हाला सुपारी मिळाली असून तुला न मारण्याचा बदल्यात ५ ते १० लाख रुपयांची मागणी करतात, तसेच ५ ते ६ चोरटे त्याच्या डोक्याला बंदूक लाऊन ठेवतात तर चोरट्यांचा एक सहकारी वाटसरुचे एटीएम कार्ड घेतो व प्रवाशाला धमकावून एटीएमचा पासवर्ड विचारून वाशिम शहरात परत येऊन प्रवाशाचे एटीएम मधून सगळे पैसे काढून घेतात. या चोरट्यांच्या गॅंग मध्ये ७ ते १० जण असून ते अंदाजे २० ते ३० वयोगटातील आहेत. त्यापैकी एका जणाला पूर्ण दाढी असून ते काळा टीशर्ट व कार्गो पँट असा वेष धारण करतात, त्यांच्यापैकी काही जणांच्या खांद्यावर कॉलेज कुमारासारखी सॅक असते व ते मोटरसायकलचा वापर करतात, त्यांच्या म्होरक्याला ते केजेब या नावाने हाक मारतात.

तसेच आम्ही मुंबई चे असून अरुण गवळी च्या टोळीचे गुंड आहोत, आम्ही तुम्हाला मारण्याची सुपारी घेतली परंतु तुमची दया आल्याने तुम्हाला सोडले, आता पोलिसात गेलात तर घरी येऊन तुमचा व तुमच्या मुलाबाळांचा गेम करू अशी धमकी देतात, यामुळे व पोलिसांवरील अविश्वासामुळे ग्रामस्थ पोलिस तक्रार देण्यास धजावत नाहीत यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन निर्माण झाले असून चोरट्यांची हिम्मत वाढली चालली आहे.

यामुळे या लूटमार करणाऱ्या टोळीचा लवकर छडा लावावा अशी मागणी होत असताना.

# मॅनेज निविदा, भ्रष्टाचाराची सुविधा!

*** बॅच मिक्स प्लांट' नसतानाही कार्यादेश;**
*** रस्ते कामाच्या निविदेत भ्रष्टाचार**
*** बांधकाम विभागाचे अधिकारी पैशासाठी लाचार**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तालुक्यातील फाळेगाव ते शिरपुटी या १० कोटी रुपये किमतीच्या मंजूर रस्त्याच्या कामासाठी जाहीर झालेल्या निविदेत कंत्राटदाराकडे स्वतःचा 'बॅच मिक्स प्लांट' असणे बंधनकारक असल्याची बाब स्पष्टपणे नमूद होती. मात्र, वाशिमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याकडे सोयीस्कर बगल देत निविदा मंजूर केली. इतकेच नव्हे, तर घाईघाईने संबंधित कंत्राटदाराच्या नावे कार्यारंभ आदेशही पारित केला. या गंभीर प्रकाराची कंत्राटदार वर्तुळात जोरदार चर्चा रंगत असून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, फाळेगाव ते शिरपुटी या मंजूर रस्ता कामाच्या निविदेमध्ये कंत्राटदाराकडे स्वतःचा बॅच मिक्स प्लांट असायला हवा, हे बंधन घालण्यात आले होते. परंतु राष्ट्रीय महामार्गाच्या कामात वापरल्या जाणाऱ्या डांबर निर्मितीचा हा मोठा प्लांट जिल्ह्यात एकाही कंत्राटदाराकडे नसल्यामुळे निविदा भरण्यासाठी कुणीही पुढाकार घेतला नाही. दुसरीकडे निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या दोन्ही कंत्राटदारांकडे असा प्लांट नसताना निविदा प्रक्रिया रद्द न करता त्यातील एका कंत्राटदाराची निविदा मंजूर करून कार्यारंभ आदेश देण्यात आला. या गंभीर बाबीमुळे इतर कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



**कार्यकारी अभियंत्याचा हात, त्यांना कोणाची साथ...**

यासंदर्भात वाशिम सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उदय बिरारी यांना छेडले असता, या मॅनेज निविदेमध्ये त्यांचा हात असून त्यांना कोणाकोणाची साथ आहे या संबंधि चर्चा होत आहे.

**१० कोटीच्या निविदेत भ्रष्टाचार अधिकारी पैशासाठी लाचार...**

'निविदेमध्ये क्रमांक १ वर स्पष्टपणे कंत्राटदाराकडे स्वतःचा 'बॅच मिक्स प्लांट' असायला हवा, हे बंधनकारक आहे. परंतु ही सुविधा नसलेल्या बहुतेक कंत्राटदारांनी निविदा भरलीच नाही. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर ही अट शिथिल करून प्लांट नसलेल्या एका कंत्राटदाराने भरलेली निविदा अंतिम करून कार्यारंभ आदेशही दिला. ही बाब अत्यंत गंभीर असून, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.'

**– वीरेंद्र देशमुख,** उपाध्यक्ष, विदर्भ कंत्राटदार संघटना, वाशिम

# मानवसेवा हिच ईश्वर सेवा या भावनेने निरंकारी सेवादल कार्यरत!









## क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांचे प्रतिपादन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**मानव सेवा हिच ईश्वर सेवा समजून संत निरंकारी मिशनचे सेवादल ब्रम्हज्ञान प्राप्तीद्वारे मानव सेवेला प्राधाण्य देतात. असे प्रतिपादन अकोला क्षेत्र निरंकारी सेवादलाचे क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांनी वाशीम येथे बोलतांना व्यक्त केले.**

संत निरंकारी मिशनच्या वतीने वाशिमच्या निरंकारी भवनात सेवा दलाचे प्रशिक्षण शिबीर मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाले. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी निरंकारी सेवा दलाचे क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांची विशेष उपस्थिती होती. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन निरंकारी मिशनचे वाशिम जिल्हाप्रमुख संतोष खोडे, श्रीराम महाराज, नामदेव महाराज यांची उपस्थिती होती. संत निरंकारी मिशनच्या. सेवादल प्रशिक्षणामध्ये निरंकारी मिशनच्या प्रमुख सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मानवतेच्या शिकवणुकीचा अंगिकार करण्याचे आवाहन क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांनी सेवादल बंधु भगिनीना केले. याच प्रकारे या प्रशिक्षण शिबीरात राष्ट्रहिताबाबत माहिती देतांना त्यांनी मानव सेवा हीच ईश्वरसेवा असल्याचे सांगतांना निरंकारी सेवादल हे कोणतीही सेवा करतांना कधीच अहंकार मनामध्ये येऊ देत नाहीत. याच प्रकारे सद्गुरुच्या दिलेल्या वचनाचा ते अंगिकार करतात ही मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सेवादल बंधु भगिनीनी कवायती करुन शारिरीक क्षमते बरोबर आत्मज्ञानाद्वारे प्रत्येकांने आत्म मंथन करण्यावर भर दिला. दर तीन महीन्याला वाशिम येथे संत निरंकारी मिशनचे सेवादल प्रशिक्षण शिबीर निरंकारी मिशनच्या निर्देशानुसार घेण्यात येईल. अशी माहीती संतोष खोडे गुरुजी यांनी दिली. निरंकारी सेवादलाचे काम संत समागमामध्ये येणाऱ्या भाविकांची सेवा तसेच निसर्ग निर्मित अथवा मनुष्य निर्मित संकटे



**वाशिम ब्रॉचे युनिट न. १९६ च्या सेवादल अधिकाऱ्यांना यावेळी नियुक्ती पत्र क्षेत्रिय संचालक शिवाजीराव पाटील यांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. वाशिम जिल्हयातुन सचिन सोनुने यांच्याकडे निरंकारी सेवादल संचालक, सुनिता राठोड यांच्याकडे निरंकारी सेवादल संचालिका हे पद देण्यात आले तर अक्षय अंभोरे यांच्याकडे सेवादल शिक्षक, स्नेहा रामवानी यांच्याकडे सेवादल शिक्षिका या पदाची जबाबदारी देण्यात आली. सद्गुरुच्या तत्वज्ञानानुसार सेवादलाचे मानवीय कार्य मोठ्या निष्ठेने आणि प्रामाणिकपणे आम्ही पार पाडु. असा विश्वास यावेळी नवनियुक्त सेवादल पदाधिकाऱ्यांनी यावेळी बोलतांना दिला.**

# हनुमान सागर'चे दोन दरवाजे उघडले!

## १०० टक्के जलसाठा; वान नदीपात्रात विसर्ग

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**संग्रामपूर :** धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे वारी भैरवगड येथील हनुमान सागर धरणातील जलसाठा १०० टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शुक्रवारी रात्री ११:४५ वाजता दोन दरवाजे प्रत्येकी २० सें.मी. उघडण्यात आले. त्यातून वान नदीपात्रात ३६.६४ घनमीटर प्रतिसेकंद अर्थात १,२९४ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.



सातपुडा पर्वतरांगांतून वाहत येणाऱ्या वान नदीवर अमरावती, अकोला आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर हनुमान सागर धरण आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत ६५५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. शुक्रवारी रात्री धरणातील जलसाठा १०० टक्क्यांवर पोहोचला असून, पातळी जलाशयाची समुद्रसपाटीपासून ४१२.०१ मीटरवर आहे. धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात कमी-जास्त प्रमाणात बदल करण्यात येणार आहे.

### सप्टेंबरअखेर ९५ टक्के जलसाठा निर्धारित

» हनुमान सागर धरणाच्या जलाशय पातळीत सातत्याने वाढ होत आहे. वान प्रकल्पाच्या मंजूर जलाशय परिचालन सूचीनुसार सप्टेंबरअखेर धरणात २५ टक्के जलसाठा ठेवणे निर्धारित आहे; मात्र पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक वाढल्याने धरणाची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी दोन दरवाजे उघडून वान नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, रात्री धरणातून पाणी सोडण्यात आल्याने वान नदीपात्रातील पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे वान प्रकल्प पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# आगाशे काका माऊली यांच्या पुण्यस्मरण निमित्त श्रीक्षेत्र बरसाना येथे भाविकांची गर्दी

## माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी घेतले दर्शन



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**खामगाव :** परमपूज्य श्री आगाशे काका माऊली (कृ ष्णानंद सरस्वती) यांच्या आठराव्या पुण्यस्मरण निमित्त अमृतनगर भागातील श्रीक्षेत्र बरसाना येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रविवार दि.27 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी काकडा आरती,काकांच्या समाधीवर पवमानाचा महाभिषेक व श्री गोपाल सहस्त्रनामाचे जपानुष्ठान, सकाळी 8.30 ते 10.30 पर्यंत श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये,श्री श्रीपादर श्रीवल्लभ चरित्र गाथा. सकाळी 11.30 वाजता नैवेद्य आरती होवुन दुपारी 12 वाजता महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली.

प.पू.काकांच्या समाधी दर्शनासाठी खामगावसह बाहेरगावावरुन आलेल्या हजारो गुरु बंधु-भगिणींनी श्रीक्षेत्र बरसाना येथे गर्दी केली होती. खामगाव विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा,माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा, माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा यांनी बरसाना येथे जावुन काका माऊलींच्या समाधीचे पूजन करून दर्शन घ्ोतले.यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते पंजाबरावदादा देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,संतोष आटोळे,सुरेंद्र चव्हाण हे उपस्थित होते. प.पु.आगाशे काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण सुद्धा करण्यात आले.

# जिगाव प्रकल्पामधील पहिल्या टप्प्यातील पाणी सोडा- अशोक मुरुख

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**संग्रामपूर :** जिगाव प्रकल्प मधील पहिल्या टप्प्यातील पाणी सोडा अशी मागणी भाज युवा मोर्चा संग्रामपूर माजी तालुका अध्यक्ष अशोक मूरुख यांनी कार्यकारी अभियंता जीगाव उपसा सिंचन विभाग खामगाव यांच्या कडे निवेदनातून केली आहे .

बुलढाणा जिल्ह्यातील घाटाखालील खामगाव, नांदुरा, जळगाव जामोद, संग्रामपूर तालुक्यातील शेतकऱ्याची शेती ही पूर्णत सिंचन झाली पाहिजे. येथील एकही शेतकरी कोरडवाहू शेती न करता बागायती शेती करून भरघोस उत्पन्न घेऊन प्रगती केली पाहिजे या उद्देशाने जीगाव प्रकल्प ची रचना करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद आहे की




आपल्या विभाग अंतर्गत ई निविदा सूचना क्र 11 सन 2023- 24 नुसार जीगाव प्रकल्प जिल्हा बुलढाणा जलाशयातून प्रथम टप्पातील पाणी उचलण्याच्या व्यवस्थचे स्थापत्य अभियांत्रिकी विद्युत इत्यादी अनुषंगिक कामे या कामास वरील निविदा सुचणे प्रमाणे 24 महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करून जलाशयातून पाणी उपसा करून शेती व शेतीसाठी पारंपारिक स्त्रोतांमध्ये पुनर्भरण करून पाणी पातळी वाढविणे व थेट शेतीपर्यंत पाणी पोहोचविणे अपेक्षित होते. त्यासाठीच निविदा काढून समयबद्ध कालावधीत काम पूर्ण करून शेतकऱ्यांच्या सेवेत अर्पित करणे होते. महोदय सन 2026 म्हणजेच चालू हंगामात मोठ्या प्रमाणावर पावसाने दडी मारल्याने व दीड महिन्याच्या वर सततचा खंड असल्याने जिगाव धरण परिसरात दुष्काळाचे स्वरूप आलेले आहे. वरील निविद्याच्या अटी व शर्तीनुसार एप्रिल 2024 ते एप्रिल 2026 या कालावधीत सदर काम पूर्ण झालेले असावे. यावर्षीच्या दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा विचार करत वरील नमूद यंत्रणा कार्यान्वित करून जिगाव धरण परिसरात व लाभ क्षेत्रात जल व्यवस्थापनाचे काम तत्काळ प्रभावाने करण्यात यावे जेणेकरून जे उद्देशाने 317,60,96,22 कोटी शासकीय निधी खर्च करून निविदा काढण्यात आलेली तो उद्देश साध्य होईल. व जिल्ह्यातील घाटाखालील जळगाव जामोद खामगाव नांदुरा या मतदार संघाना अंशता सिंचित करण्यात येईल. व दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा आक्रोश कमी होईल अशी मागणी अशोक मुरुख यांनी केली आहे.

# पंचनाम्यांच्या 'जीआर'ची होळी; हेक्टरी 50 हजार मदतीची मागणी

## बुलढाण्यात उद्धवसेनेचे आंदोलन; प्रत्यक्ष मदत द्या'चा सरकारला इशारा, सरकाच्या धोरणाचा निषेध

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**बुलढाणा :** पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान झालेले असताना शासनाने केवळ पंचनाम्यांचे आदेश काढून थांबू नये, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने रविवारी जयस्तंभ चौकात आंदोलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत आणि ॲड. जयश्री शेळके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शासनाच्या पंचनाम्यांच्या जीआर ची होळी करण्यात आली. शेकडो शिवसैनिकांनी घोषणाबाजी करीत सरकारच्या धोरणाचा निषेध केला.

जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांचा दुष्काळसदृश परिस्थितीच्या यादीत समावेश करण्यात आला असून, राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना बाधित क्षेत्रातील पिकांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. पंचनाम्यादरम्यान पिकांची छायाचित्रे आणि जीपीएस निर्देशांक संकलित करून अहवाल सादर करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. पंचनाम्यांनंतर मदतीची दीर्घ प्रतीक्षा लावण्याऐवजी सरकारने तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी उद्धवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दौऱ्यांवरही टीका

» शेतकरी आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे हवालदिल झालेला असताना सत्ताधाऱ्यांकडून आढावा बैठकींच्या नावाखाली काजू-बदाम खाण्याची 'राजेशाही व्यवस्था' आणि त्यानंतर झालेले दौरे ही केवळ नौटंकी ठरल्याची टीका करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले असून, आर्थिक मदत पोहोचण्याची गरज असताना सरकारकडून केवळ पंचनाम्यांचा निर्णय काढण्यात आला असल्याचा आरोप केला.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई जाहीर करा, अशी मागणी शेळके यांनी केली. पंचनाम्यांची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणीही त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शासनाने आणखी दुर्लक्ष केल्यास उद्धवसेनेच्या वतीने अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. उपजिल्हाप्रमुख लखन गाडेकर, जिल्हा संघटक सुमित सरदार, तालुकाप्रमुख विजय इतवारे उपस्थित होते.

### 'पंचनाम्यांने नुकसान भरून निघणार नाही!'

पावसाने जवळपास ५० दिवस दडी मारल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. सोयाबीनसह अन्य पिकांवर परिणाम झाला असून, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील पिकांचे नुकसान आणि दीर्घ कोरड्या खंडाची स्थिती यापूर्वीही विविध अहवालांतून समोर आली आहे. ॲड. जयश्री शेळके यांनी सरकारवर टीका करताना, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदतीची गरज आहे.

# आदर्श आचारसंहितेमुळे नियोजित रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-2026 स्थगित

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**बुलढाणा:** जिल्ह्यातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा यांच्या वतीने 29 सप्टेंबर 2026 रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नियोजित करण्यात आलेला 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-2026' आदर्श आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-2026 च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील 13 ठिकाणी नियोजित रोजगार मेळावे स्थगित करून पुढे ढकलण्यात आले आहेत. या मेळाव्यांच्या पुढील तारखेबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

स्थगित करण्यात आलेल्या मेळाव्यांमध्ये बुलढाणा येथील मॉडेल डिग्री महाविद्यालय, चिखली येथील श्री शिवाजी महाविद्यालय, खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन व सिद्धीविनायक टेक्निकल कॅम्पस, मलकापूर येथील जनता कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर येथील एम.ई.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणार येथील भगवानबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा येथील के.बी.जे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगाव येथील सरस्वती कॉलेज, नांदुरा येथील श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, जळगाव जामोद येथील श्रीपाद कृष्णा कोल्हटकर महाविद्यालय आणि सिंदखेड राजा येथील राजमाता पॅरामेडिकल कॉलेज यांचा समावेश आहे.

# सेवा संकल्प'अंतर्गत आरोग्य शिबिर माता, बालक, ज्येष्ठ नागरिकांची तपासणी

प्रतिनिधी २८ सप्टेंबर



**बुलढाणा:** सेवा संकल्प अभियानांतर्गत उपकेंद्र अंजनीच्या वतीने श्री विघ्नहर्ता गणेश मंडळ, अकोला ठाकरे येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रा. आ. केंद्र डोणगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका आरोग्य अधिकारी, मेहकर डॉ. सूरज ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिबिर घेण्यात आले.

शिबिरात गर्भवती (ANC) व प्रसूतीनंतरच्या (PNC) मातांची आरोग्य तपासणी, बालक व ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात आले. तसेच नागरिकांची ECG व CBC रक्त तपासणी करण्यात आली.

आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचविण्यासाठी CPRचे महत्त्व, त्याची प्राथमिक माहिती व आवश्यक काळजी याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच संतुलित आहार, आजारांपासून बचाव, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्यात आली. या आरोग्य शिबिरासाठी SBIN टीमचे सहकार्य लाभले. आरोग्य सेवा नागरिकांच्या दारी पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानाला' नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

# प्रॉपर्टीच्या वादातून वकिलाला मारहाण

## मलकापूर पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**मलकापूर:** येथील बारादरी परिसरात जुन्या प्रॉपर्टीच्या वादातून वकिलाला मारहाण केल्याची घटना २४ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी २६ सप्टेंबर रोजी मलकापूर शहर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सैय्यद तावीश सैय्यद एजाज (२९, रा. मलकापूर, हल्ली मुक्काम नागपूर) हे त्यांच्या आजीला भेटून नागपूरला जाण्याच्या तयारीत असताना आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. सैय्यद माजीद याने चाकूने तावीश यांच्या डोक्यात व डाव्या दंडावर वार केल्याने ते जखमी झाले. चौघांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. जखमी तावीश यांच्यावर मलकापूर येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यांच्या जबाबावरून सैय्यद माजीद, सैय्यद सोहेल, रेहाना परवीन आणि बुशरा महेक यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१), ११५(२), ३५२, ३५१ (२) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रॉपर्टीच्या जुन्या वादातून हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रशांत झेंडगे करीत आहेत.

# कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक- ॲड. रागिनी केदारे

## लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्यावर कार्यशाळा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**संग्रामपूर :** महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारां विरोधात समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे अधिक कडक करण्यासोबतच त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ॲड. रागिनी केदारे यांनी केले.

संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल येथील कला व वाणिज्य महाविद्यालय येथे महिला विकास कक्ष आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम, २०१३' हा कार्यशाळेचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर होते. अतिथी मार्गदर्शक म्हणून संकल्प मल्टिपर्पज फाउंडेशन, शेगावच्या संचालक शिला मोहोड व ॲड. रागिनी केदारे उपस्थित होत्या. यावेळी डॉ. सुभाष पवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. नागेश इंगळे व महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. मेघा सोळंके उपस्थित होते.

### युवावस्थेत आकर्षणासोबत विवेकही आवश्यक

» प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक डॉ. मेघा सोळंके यांनी केले. शिला मोहोड यांनी युवा अवस्थेतील आकर्षण आणि सामाजिक वावरात विवेकाने वागण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कोणतीही समस्या उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी ती पालकांशी मोकळेपणाने मांडावी, तसेच पालकांनी मुलांशी मित्रत्वाचे नाते ठेवावे, असे त्यांनी सांगितले.

# खडकी येथे आरोग्य विभागाचा 'सेवा संकल्प'

**बुलढाणा:** सेवा संकल्प अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बोराखेडीअंतर्गत उपकेंद्र राजूरच्या कार्यक्षेत्रातील खडकी गावात आरोग्य विभागाच्या वतीने विविध आरोग्यविषयक सर्वेक्षण व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या. या मोहिमेदरम्यान गावात किटकशास्त्रीय व साथरोग सर्वेक्षण करण्यात आले. संभाव्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या. तसेच सहवासित व एफएलसी (FLC) कुष्ठरुग्ण तपासणी मोहीम राबवून नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गावातील सार्वजनिक पाणी स्रोत असलेल्या नळ व विहिरींची ओटी (OT) चाचणी करण्यात आली.

# सप्टेंबरमध्येच 'ऑक्टोबर हीट'ची झळ; ढगाळ वातावरण, तरीही घामाच्या धारा!

## पाच दिवसांपासून तापमान ३४ अंशांच्या आसपास

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**खामगाव:** पावसाळ्याच्या दिवसांतही पावसाची प्रतीक्षा कायम असताना खामगावकरांना मात्र उन्हाच्या चटक्यासह उकाड्याचा सामना करावा लागत आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाने प्रदीर्घ दडी मारल्यानंतर सप्टेंबरच्या तीन आठवड्यांतही दमदार पाऊस झालेला नाही. आकाशात अधूनमधून ढग दाटत असले तरी पावसाऐवजी उन्हाचा चटका जाणवत असल्याने सप्टेंबर मध्येच 'ऑक्टोबर हीट'चा अनुभव नागरिक घेत आहेत. मागील पाच दिवसांपासून खामगावचे तापमान ३४ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. गेल्या आठवड्यात तापमानात सातत्याने वाढ झाली. या कालावधीत किमान तापमान २६ अंशांपासून कमाल ३४ अंश सेल्सि असपर्यंत नोंदविले गेले. दिवसभर उन्हाचा चटका व हवेत असलेला दमटपणा जाणवत आहे.

### उकाडा कायम राहण्याची शक्यता !

» हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत उकाड्यापासून तातडीने सुटका होण्याची चिन्हे नाहीत. पावसाची एखादी सर झाल्यास तापमानात काही प्रमाणात घट होऊ शकते. मात्र, पाऊस लांबल्यास तापमानात आणखी एक ते दोन अंशांची वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सप्टेंबरअखेर पावसाची हजेरी लागते का आणि उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळतो का, याकडे लक्ष लागले आहे.

### पावसाळा संपत आला; भूजलपातळीची चिंता

ऑगस्टपासून दमदार पाऊस नसल्याने पावसाळ्याचा कालावधी संपत येत असताना भूजलपातळीबाबतही चिंता वाढली आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना उकाड्याचा सामना करावा लागत असून, पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सप्टेंबरच्या शेवटी अपेक्षित पाऊस न झाल्यास त्याचा परिणाम पिकांच्या वाढीवरही होण्याची शक्यता आहे.

### ढगाळ वातावरण; दमट हवेमुळे उकाड्यात भर!

ढगाळ वातावरण असले तरी पावसाचा अभाव आणि हवेतील दमटपणामुळे वातावरण अधिक कोंदट जाणवत आहे. त्यामुळे सकाळपासूनच घामाच्या धारा लागण्याचे प्रमाण वाढले आहे. बदलत्या वातावरणामुळे सर्दी, ताप यांसारख्या आजारांच्या रुग्णसंख्येतही वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

# दुष्काळ जाहीर, पण ई-पिक सर्वेक्षणात अडथळा

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला:** राज्य सरकारने संपूर्ण अकोला जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित केला आहे. दुष्काळ जाहीर झाल्यावर शेतकऱ्यांना पीक नुकसानीची भरपाई मिळण्याचा हक्क असतो. ही भरपाई ई-पीक सर्वेक्षणाच्या आधारावर दिली जाते. अनेक शेतकऱ्यांच्या शेतांचे ई-पीक सर्वेक्षण झालेले नाही. यामुळे शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. यावर्षी सरकारने ई-पीक सर्वेक्षणाची जबाबदारी सर्वेक्षण सहायकांवर सोपवली आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये ई-पीक सर्वेक्षण सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक पिकांचे ई-पीक सर्वेक्षण अद्याप प्रलंबित आहे.

## ई- पीक सर्वेक्षणानंतर नुकसानीचा अहवाल



### नुकसानीची भरपाई निश्चित नाही

» दुष्काळ जाहीर झाल्यावर १२ प्रकारच्या सेवा आणि सुविधा पुरवल्या जातील, असे सरकारने जाहीर केले आहे. पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भरपाईची नेमकी रक्कम अद्याप स्पष्ट झालेली नाही. यासंदर्भात लवकरच अधिसूचना जारी केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

### जिल्ह्यातील प्रमुख खरीप पिके

» जिल्ह्यात १लाख ६३ हजार २५५ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या प्रमुख खरीप पिकांमध्ये सोयाबीन, कापूस, तूर आणि ज्वारी ही मुख्य पिके होती. अनेक ठिकाणी ५०त्न च्या आत पाऊस पडला आहे संपूर्ण जिल्ह्यात पावसाचा खंड स्पष्ट दिसत आहे

### ई-पीक सर्वेक्षणानंतर नुकसानीचा अहवाल

» शेतकऱ्यांना पीक नुकसानीची भरपाई देण्यासाठी क्षेत्रीय पेरणी सर्वेक्षण आवश्यक आहे. ई-पीक सर्वेक्षणाशिवाय पेरणीचे क्षेत्र निश्चित करता येत नाही. त्यामुळे, सर्वप्रथम ई-पीक सर्वेक्षण केले जात आहे. ई-पीक सर्वेक्षणासाठी डीसीएचएमएच (डिजिटल क्रॉप सर्व्हे) ॲप विकसित करण्यात आले आहे. नमुना ७/१२ वर ई-पीक सर्वेक्षणाची नोंद झाल्यानंतर पीक नुकसानीचा अहवाल तयार केला जाईल. नुकसान सर्वेक्षण ५ ऑक्टोबरपासून सुरू होईल. सरकारने ई-पीक सर्वेक्षण त्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

# पोषण आहार योजनेचे स्वयंपाकी वेतनापासून वंचित

## एप्रिल महिन्यापासून नाही मिळाले वेतन



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला:** प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत (पीएमपोषण योजना) राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन तयार करणाऱ्या स्वयंपाक्यांची एप्रिल २०२६ पासूनची मजुरी थकलेली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षण विभागाकडे थकीत मानधन तात्काळ देण्याची मागणी केली आहे.

**एप्रिलपासून स्वयंपाकी वेतनापासून वंचित**

पंतप्रधान पोषण योजना या कार्यक्रमांतर्गत, स्वयंपाकी तुटपुंज्या वेतनावर विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक जेवण तयार करतात. या कामासाठी नियमित रोजंदारीची आवश्यकता असते, ज्यामुळे त्यांना इतरत्र काम मिळत नाही. अशा परिस्थितीत, त्यांना मिळणारे मानधन हा त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असतो. शिक्षक समितीने सरकारकडे सादर केलेल्या विनंतीनुसार, एप्रिल २०२६ चे मानधन अद्याप मिळालेले नाही. विदर्भ वगळता राज्यभरातील शाळा १५ जून रोजी पुन्हा सुरू झाल्या आणि विदर्भ विभागातील शाळा ३० जून २०२६ रोजी पुन्हा सुरू झाल्या. असे असूनही, पौष्टिक जेवण तयार केल्याबद्दल स्वयंपाक्यांना त्यांचे मानधन मिळालेले नाही. श्रावण आणि भाद्रपद महिन्यांत विविध सण साजरे केले जातात. या तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या स्वयंपाक्यांचे थकीत मानधन त्यांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढवत आहे. नवरात्री, दसरा, धम्मचक्र प्रवर्तन दिवस आणि दिवाळी यांसारखे महत्त्वाचे सण येत आहेत. त्यामुळे, थकीत मानधन तात्काळ देण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्यातील सर्व स्वयंपाक्यांना थकीत मानधन तात्काळ देण्याची मागणी केली आहे. सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन स्वयंपाक्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गांधी चौकापासून बसस्थानक पर्यंत पथदिवे रात्री बंद दिवसा सुरु

## बिघडलेल्या ताळतंत्राचा आणखी एक नमुना

प्रतिनिधी २८ सप्टेंबर



**अकोला :** शहरात गांधी चौक ते बसस्थानक पर्यंत वर्दळीच्या रस्त्यावर पथदिवे रात्री बंद तर दिवसा सुरू असतात.

नागरिक देखील यामुळे बुचकळ्यात पडले आहेत. या बाबतीत सुसूत्रता यावी तसेच आवश्यक वेळी पथदिवे सुरू राहावे अशी मागणी आहे. कारण रात्री पथदिवे बंद राहिले तर काही उपयोगाचे नाही. गांधी चौक ते बसस्थानक मार्ग रात्रंदिवस वाहता असतो. तसेच नागरिकांच्या सोयी साठी पथदिवे रात्री च्या वेळी सुरू राहणे आवश्यक आहे. परंतु महापालिका विद्युत विभागाचे काम शहरात कशाप्रकारे सुरू आहे हे दिसते. परंतु रात्री अपरात्री घराबाहेर पडणाऱ्या लोकांसाठी पथदिवे सुरू राहणे सोयीचे ठरते. सध्या जो प्रकार चालू आहे त्याला आळा बसणे गरजेचे आहे. नागरिक याबाबत नाराजी व्यक्त करीत आहेत.

# अकोल्यात पहिले अभिजात मराठी भाषा संमेलन

## अध्यक्षपदी डॉ. रवींद्र शोभणे, कविसंमेलनाचीही मिळणार मेजवानी

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** मराठी भाषेला केंद्र शासनाकडून मिळालेल्या ऐतिहासिक अभिजात दर्जाच्या पार्श्वभूमीवर, अकोला येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'पहिल्या अभिजात मराठी भाषा संमेलना'च्या अध्यक्षपदी ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे राहणार आहेत.

हे एकदिवसीय राज्यस्तरीय संमेलन शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात संपन्न होणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वऱ्हाड शैक्षणिक, सामाजिक बहुउद्देशीय संस्था, लोणी आणि श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने या



संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. रवींद्र शोभणे हे मराठी साहित्यातील सिद्धहस्त कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित आहेत. अमळनेर येथे पार पडलेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी अत्यंत यशस्वीपणे भूषवले होते. मराठी भाषा, तिचे ऐतिहासिक मूळ आणि समकालीन आव्हाने या विषयांवर त्यांचा गाढा अभ्यास असून, मराठीला अभिजात भाषेचा बहुमान मिळाल्यानंतर आयोजित होणाऱ्या या पहिल्या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांच्याकडे सोपवण्यात आल्याने साहित्य वर्तुळातून विशेष आनंद व्यक्त होत आहे. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेव कांबळे यांच्या हस्ते होणार असून, उद्घाटन सोहळ्यात राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे, श्री शिवाजी महाविद्यालय विकास समितीचे प्रा. सुरेश राऊत आणि प्रभात कीड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, मराठी विश्वकोश मंडळाचे विद्याव्यासंगी साहाय्यक डॉ. जगतानंद भटकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय पोहरे व वऱ्हाड संस्थेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. दिवसभरात 'मराठी भाषेची अभिजातता आणि पुढील दिशा' व 'मराठी विश्वकोश वाचताना' या विषयांवर अभ्यासपूर्ण परिसंवाद, विशेष सत्कार सोहळा आणि राज्यभरातील ५० हून अधिक कवींचे निमंत्रित कवी संमेलन रंगणार आहे.

# गुलाल उधळण्यावरुन खामखेडमध्ये राडा

## दोन्ही गटातील 40 जणांवर गुन्हे, 4 अटकेत



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**पातूर :** तालुक्यातील खामखेड येथे गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान गुलाल उधळण्याच्या कारणावरून दोन गटात झालेल्या वादाचे पडसाद रविवारी पुन्हा उमटले. यावेळी दोन्ही गटांत झालेल्या राड्यात नितीन बबन काळे जखमी झाला असून, त्याला अकोला येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी दोन्ही गटातील ४० जणांविरुध्द गुन्हे दाखल करणयात आले. चौघांना अटक केली आहे. शनिवारी गणपती मिरवणुकीदरम्यान गुलाल उधळण्याच्या कारणावरून दोन गटात वाद निर्माण झाला होता. या वादानंतर गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रविवारी याच वादातून पुन्हा दोन्ही गट आमनेसामने आल्याने राडा झाला. या घटनेत एक जण जखमी झाला असून, त्याच्यावर अकोला येथे उपचार सुरू आहेत. घटनेनंतर दोन्ही गटांनी पातूर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या आहेत. दरम्यान, रविवारी रात्री उशिरापर्यंत पातूर पोलिसांकडून तक्रारींची पडताळणी करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेमुळे खामखेड परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थान कडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी 1 कोटी 11 लाख रुपये




प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**शेगाव :** संत श्री गजानन महाराज संस्थानकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी 1 कोटी 11 लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. संस्थानच्या विश्वस्तांनी धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुपूर्द केला.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती तसेच अडचणीत सापडलेल्या शेतक-यांसाठी मदतीचा हात म्हणून पुढाकार घेतला. आपदग्रस्तांना मदत करण्यासाठी संत श्री गजानन महाराज संस्थानचा नेहमी पुढाकार असतो. संस्थानकडून सामाजिक बांधिलकी नेहमी जोपासली जाते. तसेच यावेळी पावसा अभावी जी भीषण आपत्ती ओढवली आहे अशा वेळी शेतकरी शेतमजूर यांच्यासाठी 1 कोटी रुपये दिले आहे.

श्री गजानन महाराज संस्थानच्या सामाजिक आणि मानवतावादी सहायतेची प्रशंसा होत आहे. अनुकरणीय कृती असे वर्णन लाखो भक्त करीत आहेत.

# अकोल्यात 'मिशन सुधार'चा दणका; 10 हजारांहून अधिक शिधापत्रिकांचा धान्यपुरवठा बंद

प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अपात्र लाभार्थ्यांची छाननी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'मिशन सुधार' अभियानाचा अकोला जिल्ह्यात मोठा परिणाम झाला आहे. शिधापत्रिकांची पडताळणी केल्यानंतर १० हजारांहून अधिक शिधापत्रिका अपात्र आढळल्या असून, या शिधापत्रिकांवरील शासकीय धान्याचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे रेशन व्यवस्थेतील अपात्र लाभार्थ्यांवर प्रशासनाने कारवाई केली आहे. आधार क्रमांक, शिधापत्रिका आणि शासकीय नोंदींची पडताळणी करताना विविध विसंगती आढळून आल्या. यामध्ये दुबार नोंदी, मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित लाभार्थी तसेच पात्रतेच्या निकषात न बसणाऱ्या लाभार्थ्यांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. पडताळणीत अपात्र ठरलेल्या शिधापत्रिकांवरून यापुढे शासकीय धान्याची उचल करता येणार नाही.

### पात्र लाभार्थ्यांचे धान्य वाचणार

» अपात्र लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून वगळल्यामुळे शासनाच्या धान्य वितरणावरील अनावश्यक भार कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी शासनाकडून मिळणारे धान्य पात्र आणि गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. दरम्यान, या प्रक्रियेत एखादा पात्र लाभार्थी चुकीने अपात्र ठरला असल्यास त्याला आपली पात्रता सिद्ध करण्याची संधी राहणार आहे. संबंधित लाभार्थी आवश्यक कागदपत्रांसह पुरवठा विभागाकडे आक्षेप नोंदवू शकतो. फेरतपासणीत पात्रता सिद्ध झाल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

### शिधापत्रिका रद्द नाही; धान्यपुरवठाच बंद

» या कारवाईतील महत्त्वाची बाब म्हणजे १० हजारांहून अधिक शिधापत्रिका पूर्णपणे रद्द करण्यात आलेल्या नाहीत. या शिधापत्रिकांवरील शासकीय धान्याचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. शिधापत्रिकेशी संबंधित इतर लाभांबाबतची प्रक्रिया शासनाच्या नियमानुसार सुरू राहणार आहे.

# खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते 'अमृत भारत एक्स्प्रेस'चे स्वागत



प्रतिनिधी २८ सप्टेंबर

**अकोला :** बहुप्रतिक्षित 'अमृत भारत एक्स्प्रेस'चे जल्लोषात स्वागत करून तिला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. याप्रसंगी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर आणि आमदार वसंत खंडेलवाल, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजपचे महानगर अध्यक्ष जयंत मसने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्यासोबतच अकोला रेल्वे स्थानक व्यवस्थापक, मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, डीआरयूसीसी सदस्य, अकोला रेल्वे सल्लागार समिती सदस्य, आरपीएफ व जीआरपीचे जवान आणि मोठ्या संख्येने अकोलेकर नागरिक उपस्थित होते.

या ट्रेनमुळे नागरिकांना एका अत्यंत सुखकर, जलद आणि आरामदायी प्रवासाचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.

# अकोला रेल्वे स्टेशन ड्रग्ज वाहतुकीचा मार्ग बनतोय का? 18 वर्षीय तरुण अटकेत

प्रतिनिधी २८ सप्टेंबर



**अकोला :** रेल्वे स्थानकांवरून मादक पदार्थांची वाहतूक रोखण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वे पोलिसांकडून कारवाया सुरू असतानाच अकोला रेल्वे स्थानकावर पुन्हा मोठ्या प्रमाणात गांजा जप्त झाल्याने रेल्वेमार्गातून होणाऱ्या अमली पदार्थांच्या वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सप्टेंबरमध्ये तब्बल ९.१९८ किलो गांजा जप्त झाल्यानंतर जानेवारीतही अकोला स्थानकावर १.८८७ किलो गांजा पकडण्यात आला होता. त्यामुळे अकोला रेल्वे स्थानकाचा वापर मादक पदार्थांच्या वाहतुकीसाठी होत आहे का, याचा तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे. २४ सप्टेंबरच्या रात्री च्ऑपरेशन नारकोसज्अंतर्गत आरपीएफ आणि सीआयबीच्या संयुक्त पथकाने शालीमार एक्स्प्रेसची अकोला स्थानकावर तपासणी केली. रात्री सुमारे ९.३१ वाजता ट्रेन प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर आल्यानंतर एक तरुण घाईघाईने स्थानकाबाहेर जाण्याचा प्रयत्न करताना पथकाच्या निदर्शनास आला. संशयावरून त्याची झडती घेतली असता काळ्या रंगाच्या बॅगेत सात पॅकेट आढळून आले. या पॅकेटमध्ये एकूण ९.१९८ किलो गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ४ लाख ५९ हजार ९०० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी १८ वर्षीय मोहम्मद सज्जाद अन्सारी याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी जीआरपीकडे सोपविण्यात आले. एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

### जानेवारीतही गांजा जप्त

» यापूर्वी जानेवारी २०२६ मध्ये अकोला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक सहावर कारवाई करताना रेल्वे पोलिसांनी १.८८७ किलो गांजा जप्त केला होता. हा गांजा चंद्रपूरला नेला जात असल्याची माहिती त्या वेळी समोर आली होती. रेल्वे पोलिसांसमोर तपासाचे आव्हान आहे.

# महाराष्ट्राच्या मातीत आजही जिवंत भुलाबाईची समृद्ध परंपरा

## महिला-युवतींच्या पारंपरिक गीतांनी रंगतो भुलाबाई उत्सव

प्रतिनिधी २८ सप्टेंबर



**अकोला :** महाराष्ट्राच्या लोकपरंपरेला समृद्ध करणाऱ्या विविध सण-उत्सवांमध्ये भुलाबाई उत्सवाला विशेष महत्त्व आहे. महिला आणि युवतींच्या सहभागातून पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा हा उत्सव आजही ग्रामीण आणि शहरी भागातील सांस्कृतिक नातं अधिक घट्ट करताना दिसतो. पारंपरिक गीतं, पूजा आणि सामूहिक सहभागातून या उत्सवाची वेगळीच रंगत पाहायला मिळते.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये अनेक सण-उत्सवांना शतकानुशतकांची परंपरा लाभली आहे. याच समृद्ध परंपरेतील एक महत्त्वाचा उत्सव म्हणजे भुलाबाई उत्सव. या काळात महिला आणि युवती एकत्र येत भुलाबाईची विधिवत पूजा करतात. त्यानंतर पारंपरिक भुलाबाईची गाणी म्हणत उत्सवाचा आनंद साजरा केला जातो.या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे, तर त्यातून निर्माण होणारा सामूहिक सहभाग आणि सांस्कृतिक संवाद. एकत्र येऊन पारंपरिक गीते म्हणणे, पूजा करणे आणि प्रसादाचे वाटप करणे, या माध्यमातून जुन्या रूढी-परंपरांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवला जातो.

विशेष म्हणजे आधुनिक जीवनशैली आणि बदलत्या काळात अनेक पारंपरिक प्रथा हळूहळू कमी होत असताना, भुलाबाई उत्सवाच्या माध्यमातून लोकगीतं, पारंपरिक रीतिरिवाज आणि सामूहिक संस्कृती आजही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिला आणि युवतींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या उत्सवाला विशेष रंगत प्राप्त होते. त्यामुळे भुलाबाई उत्सव हा केवळ पूजेपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा आणि लोकपरंपरेचा जिवंत ठेवा ठरत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135